प्रकरण चौथे

# 'बारोमास' मधील व्यक्तिरेखा आणि त्यांचा संघर्ष

# प्रकरण चौथे

# 'बारोमास' मधील व्यक्तिरेखा आणि त्यांचा संघर्ष

## ❖ प्रास्ताविक: -

प्रस्तुत प्रकरणात आपण 'बारोमास' मधील व्यक्तिरेखा आणि त्यांच्या संघर्षमय जीवनाचा परामर्श घेणार आहोत. 'बारोमास' मधील रेखाटलेल्या सर्व व्यक्तिरेखा एका समान सूत्रामध्ये गोवल्यासारख्या आहेत. या व्यक्तिरेखांचे आणखी एक वैशिष्टय असे सांगता येईल की त्या व्यक्तिरेखा ठायी - ठायी जीवनाशी संघर्ष करत जगणाऱ्या आहेत. या व्यक्तिरेखा बऱ्याचदा जीवनसंघर्षात झुंजताना हारतात. याला अपवाद एकनाथ या व्यक्तिरेखेचा मानावा लागेल. त्याने सकारात्मक विचार करून पुढे जाण्याचा एक प्रयत्न केला आहे. जीवन जगताना प्रतिकूल परिस्थितीशी सामना करताना या व्यक्तिरेखा पराभूत होताना दिसतात. सकारात्मकतेच्या दृष्टिकोनाचा अभाव बऱ्याच व्यक्तिरेखांच्या विचारामध्ये आढळतो. प्रत्येक व्यक्तिरेखा आपल्या वैचारिक कुवतीनुसार योग्य ठिकाणी आहेत. या व्यक्तिरेखांच्या अंतरंगाचा, स्वभावधर्माचा शोध येथे नायकाची तत्त्वनिष्ठा आणि जीवनमूल्ये, हृदयस्पर्शी स्त्रीव्यक्तिरेखा, संघर्ष करण्याचे बळ आणि धडपड, सुशिक्षित पण बेरोजगार तरूणांच्या जीवनाची झालेली परवड मुद्यांच्या आधारे आपणास घ्यावयाचा आहे.

## ❖ नायकाची तत्त्वनिष्ठा आणि जीवनमूल्ये: -

आजच्या काळातील धावपळीच्या जीवनात दिवसेंदिवस स्पर्धा अधिक तीव्र होत आहे. जागतिकीकरणाच्या या युगात आजची तरूणपिढी आपले संस्कार परंपरा जीवनमूल्ये विसरत चाललेली दिसते. झटपट श्रीमंत होण्याच्या नादापायी आपली तत्त्वे आपली जीवनमूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. देशाचे आधारस्तंभ म्हणून ज्या युवापिढीकडे पाहिले जाते त्याच युवापिढीला व्यसनाधिनतेचे, गुन्हेगारी क्षेत्राचे ग्रहण लागलेले दिसून येते. लेखकाने 'बारोमास' या कलाकृतीतून सुशिक्षित तरूणांच्या जीवनाची झालेली परवड त्यांच्या या परिस्थितीला कारणीभूत असलेली विषमाधिष्ठीत समाजव्यवस्था त्याचबरोबर भ्रष्टाचाराची किड या साऱ्या गोष्टींवर भाष्य करून लेखकाने समाजाच्या डोळयात अंजन घातले आहे. 'बारोमास' या कलाकृतीतील बरेच तरूण हे आपली तत्त्वे वा जीवनमूल्ये विसरलेली दिसतात. पण कादंबरीचा प्रमुख नायक 'एकनाथ' मात्र आपल्या तत्त्वांशी एकनिष्ठ वाटतो. जीवनमूल्यांची जोपासना करताना दिसून येतो. आजच्या काळातील नवयुवक म्हणून

‘एकनाथ’ ही व्यक्तिरेखा अधिक प्रभावीपणे लेखकाने उभी केली आहे. समाजात असे अनेक तरूण आहेत की, जीवनात असफल झालो म्हणून समाजाला दोष देतात. तसेच आपल्या जीवनमूल्यांचाही त्यांना विसर पडलेला आहे. पण एकनाथ मात्र आपली जीवनमूल्ये विसरत नाही. ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

‘बारोमास’ या कलाकृतीचा प्रमुख नायक ‘एकनाथ तनपुरे’ हा अत्यंत संवेदनशील मनाचा तरूण आहे. मराठी विषयात एम्. ए. बी.एड्. झालेला सुशिक्षित बेकार म्हणून जीवन जगत असतो. ‘लीळाचरित्र’ या ग्रंथावर त्यांचे अतोनात प्रेम असते. एक मुलगा किंवा पती म्हणून कर्तव्य पार पाडण्यात तो अयशस्वी झाला असला तरी पुन्हा नव्या उमेदीने उभा राहण्याचा प्रयत्न करतो. येथे त्यांची तत्त्वनिष्ठा आणि जबरदस्त इच्छाशक्ती दिसून येते. द्विपदवीधर होऊन सात आठ वर्षे लोटलेली असतात. नोकरीसाठी बऱ्याच ठिकाणी मुलाखती देतो पण प्रत्येक ठिकाणी त्याला एकच अनुभव येतो. तो म्हणजे संस्थाचालक भरमसाठ डोनेशन मागतात आणि हेच डोनेशन भरण्यासाठी एकनाथजवळ पैसे नसतात. एक लाख रूपये डोनेशन भरण्यासाठी शेती विकण्यास वडिलांचा ठाम नकार असतो. शेवटी नाईलाजास्तव शेतीव्यवसायाकडे वळतो येथेही त्याला अपयश येते. नोकरी न लागल्याने शहरात राहायला मिळत नाही, निदान शहरातील मुलीशी लग्न करावे या विचारातून त्याने शहरातल्या अलकाशी लग्न करतो. पण पुन्हा याचाच पश्चात्ताप करीत बसतो. शहरी जीवनाचे त्याला असणारे आकर्षण हळूहळू कमी होत जाते. शहरी संस्कृतीत वाढलेली अलका ग्रामीण जीवनाशी समरस होऊ शकत नाही. शेवटी त्याला संसारामध्येही अपयश येते त्यामुळे त्याचे मन अधिकच व्यथित होते. तो मनाशी ठरवित असतो एक पण प्रत्यक्षात मात्र होते दुसरेच त्याचा प्रत्येक अंदाज चुकतो. संसाराचा रथ कितीही सरळ मार्गावर आणण्याचा प्रयत्न केला तरीही तो रथ अर्ध्या वाटेवरच मोडून पडतो. आई - वडिलाविषयी त्याच्या मनात आदर असतो. त्यांच्या शब्दांना मान देत असतो. केवळ नोकरीसाठी आई वडिलांनी एवढया कष्टाने मिळविलेली शेती विकावी तेही त्यांची इच्छा नसताना हे त्याच्या मनाला पटत नव्हते म्हणूनच तो नाईलाजास्तव शेती करू लागतो. वडिलधाऱ्या माणसाविषयी त्याच्या मनात अपार आदर आहे. एकनाथचे जसे आपल्या माणसावर जिवापाड प्रेम आहे. तसेच दारातील प्राणीमात्रांवर शेतातील झाडा - झुडपांवर असते. चंद्री मांजरीला तो क्षणभरही विसरत नाही. मांजर मरते तेव्हा तो हताश होतो. धाकटा मधु पैशासाठी शेतातली सर्व झाडे तोडून विकतो तेव्हा त्याला विरोध करतो. परंतु मधु त्याला जुमानत नाही. त्याला झाडाची दुर्दशा पहावी लागते. दीर भावजयमध्ये किरकोळ कारणावरून वाद होतो. मधु अलकाच्या

थोबाडीत मारतो म्हणून एकनाथ मधुला मारण्यासाठी धावतो पण त्याला मधुचाच मार खावा लागतो. मनात त्याच्याविषयी संताप असूनही तो त्याला काही करू शकत नाही. सासुरवाडीत वारंवार अपमान सहन करावा लागतो तोही अपमान निमूटपणे सहन करीत असतो. आपणच या सर्व गोष्टींना कारणीभूत आहोत असे त्याला मनोमनी सतत वाटत असते.

कौटुंबिक कर्तव्ये पार पाडताना एकनाथला अनंत यातना भोगाव्या लागतात. रात्रंदिवस कष्ट करणाऱ्या आईविषयी त्याच्या मनात अपार प्रेम आहे. शिक्षणासाठी आई - वडिलांनी रात्रंदिवस उन्हातान्हात काढलेल्या खास्ता उपाशी राहून काढलेले दिवस याची जाणीव असून पण तो त्यांच्यासाठी काहीच करू शकला नाही याचे शल्य त्याच्या मनाला सतत बोचत असते. शेवंतामायच्या भाचीचा पत्नी म्हणून स्वीकार करण्यास एकनाथ नाही म्हणतो म्हणून शेवंतामायच्या मनात अढी निर्माण झालेली असते पण तो सुशिक्षित असल्यामुळे त्याला सुशिक्षितच मुलगी बायको करायची होती म्हणून सुशिक्षित असलेल्या अलकाशी लग्न करतो हा विचार त्याच्या दृष्टीने योग्यच होता पण दुर्दैवाने पती - पत्नीमध्ये वैचारिक तसेच सांस्कृतिक संघर्ष निर्माण होतो. शेतकरी म्हणून जगणारा एकनाथ एका कोंडीत सापडतो. घरात सतत वाद विवाद निर्माण होतो. कधी सासू सुनेमध्ये कामावरून वाद होतात तर कधी पती पत्नीमध्ये मतभेद होतात तर कधी दीर भावजयमध्ये खडाजंगी होत असते. एकमेकांविषयी प्रेम आपुलकी कमी होत जाते मने क्लुषित होतात. गैरसमज वाढत जातात कुणीही कुणाचा विचार करायला तयार होत नाही. प्रत्येकजण आपल्या विचारांना धरूनच वागत असतो. त्यामुळे घरात सतत भांडणे होतात. पती पत्नीमध्ये हळूहळू दुरावा निर्माण होतो. अलकाला या साऱ्या गोष्टी सहनशीलतेच्या पलीकडच्या असतात. म्हणूनच ती सर्व नातीगोती तोडून कायमचे संबंध तोडून माहेरी निघून जाते. घरात भांडणे झाली की अलका माहेरी जात असे. एकनाथ पुन्हा पुन्हा तिची समजूत घालून माघारी आणीत असतो. पत्नी असूनही तो अलकावर जबरदस्ती करू शकत नाही किंवा पुरूषीहक्कसुध्दा तिच्यावर लादत नाही. प्रत्येक वेळी तो अलकाला मदतीचा हात देत असतो. पण अलका मात्र त्याच्या संसारामध्ये उभी राहू शकत नाही. कायमचे सासर सोडून गेल्यावर मात्र पुन्हा तिला माघारी आणण्याचे धाडस करू शकत नाही. येथे एकनाथची अगतिकता, असहायता दिसून येते. पुरूष असूनही गरिबीमुळे बायकोपुढे नमते घ्यावे लागते. ही त्याची घोर वंचनाच म्हणावी लागेल. तिच्या जाण्याने तो आयुष्यातून पूर्णपणे उन्मळून पडतो. येथे अलकाचा विजय तर एकनाथचा पराजय होतो. पत्नीच्या दु:खास आपणच कारणीभूत आहोत ही वेदनाच त्याला असह्य

होऊन जाते इतका तो हळव्या मनाचा असतो. त्याच्या उलट धाकटा भाऊ मधु हा बंडखोर वृत्तीचा असतो. घरात असून नसल्यासारखा असतो. मोठा भाऊ म्हणूनही त्याच्यावर हक्क गाजवू शकत नाही. सासू सूनेमध्ये भांडण लागले असता तो कोणाचीच बाजू घेऊ शकत नाही. कारण पत्नीची बाजू घेतली तर आई रागावेल आणि आईची बाजू घेतली तर पत्नी दुखावेल. येथे त्याचे मन द्विधा अवस्थेत सापडलेले दिसून येते. आई - वडिलांसाठी आपण काहीच करू शकलो नाही त्यांची कोणतीच हौस करू शकलो नाही याची त्याच्या मनाला सतत खंत वाटते. आपण साधे लुगडेसुध्दा आईला घेऊ शकत नाही या विचाराने तो पूर्णपणे खचला जातो. याविषयी लेखक लिहितो '....तू तिला प्रत्येक पगारावर नवे लुगडे घेऊन देण्याचे आश्‍वासन दिले होते. पण तरूणपणापासून तर म्हातारपणापर्यंत ती दिवसाआड दांडाचे लुंगडे नेसत आहेच. हे म्हणजे तू तिचा मुलगा या नात्याने तुला जीव देता यावा एवढे सबळ कारण आहे. या विचाराने त्याच्यातला गहिवर दाटून आला.'[१] येथे मुलाचे कर्तव्य पार पाडू शकलो नाही अशी खंत व्यक्त केलेली आहे.

सुशिक्षित असून नोकरी नाही. सर्व नाती असूनसुध्दा एकाकी पडणाऱ्या एकनाथचे मन थकून जाते. जीवनात आलेल्या अपयशाने मन अधिकच खचून जाते. व्यथित मनातील विचारांचे आंदोलन सतत हेलकावताना दिसते. त्याच्या मनातील आंदोलनाविषयी लेखक लिहितो 'शेती असून शेतकरी नाही. शिक्षण असून कर्मचारी नाही. घर असून बेघर झालेले. भाऊ असून भाऊ नसल्यासारखे. शिक्षित असून अशिक्षित असल्यासारखे. बायको असून बायको नसल्यासारखे. गाव असून गाव नसल्यासारखे....एकाकी एकटे....खऱ्या अर्थाने आपण एक - नाथ'[२] तो सतत तणावग्रस्त जीवन जगत असतो. एकनाथ विषयी डॉ. भालचंद्र नेमाडे लिहितात, "सुशिक्षित, शेतीला लागलेल्या, नोकरी न मिळाल्याने चैतन्य गेलेल्या तरूण पुरूषावरचे सर्व ताण त्यात आले आहेत....एकनाथसुध्दा सर्व संवेदना खुल्या करणारा राहिला."[३] येथे एकनाथ एकाकी पडलेला दिसतो.

कौटुंबिक जीवन संघर्षात एकनाथ अपयशी होतो. संकाटामागून संकटे येतात तरीही हे सर्व अपयश सहन करून नव्या विचाराने उभा राहतो. कादंबरीतील बऱ्याच व्यक्तिरेखा व्यसनी गैरमार्गाला लागलेल्या बंडखोरवृत्तीच्या दिसतात. कौटुंबिक जबाबदारी नाकारतात पण एकनाथची व्यक्तिरेखा मात्र आपल्या तत्त्वाशी जीवनमूल्याशी एकनिष्ठ राहताना दिसते. तो कोणत्याही वाममार्गाचा अवलंब करीत नाही किंवा आपली नीतीमूल्ये पायदळी तुडवित नाही. नि:स्वार्थीपणे समाजकार्यासाठी स्वत:ला वाहून घेतो. एकनाथ सतत विचारात मग्न असतो. कौटुंबिक, सामाजिक

संघर्षामध्ये तावून - सुलाखून निघालेला एकनाथ शेतकऱ्यांसाठी नवे निशाण फडकविताना दिसतो. त्यात त्याला अपयश आले असले तरी त्याने नवी दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य पार पाडले आहे. ही गोष्ट प्रशंसनीय आहे असे म्हणावे लागेल.

संपूर्ण कादंबरीभर एकनाथ परिवर्तनशील विचारात गुंतलेला दिसतो. कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक झळ त्याला पोहचलेली असते. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे सुशिक्षित जीवन जगणाऱ्या तरूणांच्या वेदनांचे विचारमंथन करीतच तो कादंबरीभर वावरत असतो. या विचारांना कादंबरीच्या अंतिम टप्प्यात मूर्तरूप प्राप्त करून दिले आहे. त्याने कोणत्याही एका गोष्टीला महत्त्व दिलेले नाही. तो समतोल विचार करणारा तरूण म्हणून त्याची दखल घ्यायला हवी. प्रत्यक्ष कृतीने एकनाथची सक्षमता कळून येते. प्रगल्भशाली विचारातून शेतकऱ्यांची नवी चळवळ उदयास येऊ पाहत आहे. याची जाणीव लेखकाने कादंबरीतून करून दिली आहे. शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचा त्याने ध्यास घेतलेला आहे. खुरटून गेलेल्या आयुष्याला एक नवी पालवी फुटल्यासारखे एकनाथला वाटू लागते. शेतकरी संघटनेमुळे एकनाथच्या आशा - आकांक्षा जिवंत राहतात. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली. तरच देश सुधारणार आहे. शेतकऱ्यांना लागलेले ग्रहण सोडवण्यासाठी एकनाथ जीवावर उदार होतो. येथे त्याचा मनस्वी स्वभाव दिसतो.

शेतकऱ्यांचा उध्दार करण्याची उत्कट आस त्याने मनात बाळगली आहे. मनात एक जिद्द धरून प्रामाणिकपणे समाजाची जाणीव ठेवून एकनाथ शेतकरी बांधवाच्या हितासाठी लढा देण्यास तयार होतो. एकनाथ हा खुद्द शेतीव्यवसाय करीत असल्याने त्याने दारिद्र्याचे चटके भोगलेले आहेत. शेतकऱ्यांच्या व्यथा वेदना अनुभवू शकला आहे. साऱ्या शेतकरी वर्गाला जागृत करण्यासाठी त्याचे मन टाहो फोडत आहे. असह्य दु:खाच्या चटक्यानी पोळून निघालेल्या शेतकऱ्यांचे मन बंड करू पहात आहे. भविष्य काळातील एक नव्या आशेचा किरण आहे असे मानायला हरकत नाही.

एकनाथ हा अत्यंत विचारशील प्रवृत्तीचा असून त्याला सत्य परिस्थितीची जाणीव असल्याने अत्यंत संयमशील मनाने सद्सद् विवेकबुध्दीने विचार करून शेतकऱ्यांसाठी असलेल्या संघटनेत सामील होतो. चक्काजामचे नेतृत्त्व स्वत: करतो. मोर्चामध्ये सामील होऊन घोषणाबाजी करतो पण दुर्दैवाने एकनाथला अटक होते. येथे एक खंबीर मनाचा उपेक्षित शेतकरी कुटुंबात जन्माला आलेला शेतकरी संघटनेचा नेता म्हणून एकनाथ उदयास येऊ पहात आहे. एकनाथ हा पुस्तकी ज्ञानापेक्षा जीवनानुभवातून येणाऱ्या अनुभवाने खूप काही शिकला आहे हे आपणास लक्षात येते.

आई - वडिलांना समजून घेण्याची ताकद एकनाथच्या विचारांमध्ये दिसते. आयुष्यात आलेल्या अनुभवातून एकनाथ हा धाडसी विचारी परिपक्व विचारांचा बुध्दिवादी तरूण निर्माण होतो. एकनाथच्या विषमाधिष्ठीत समाजव्यवस्थेविषयी मनात विलक्षण द्वेष आहे. 'खेडवळ' पणाचे टोमणे वारंवार मेहुणीने मारल्याने मनाला जखमा होतात. मनामध्ये राग येत असूनही तो काही करू शकत नाही. येथे त्याच्या सहनशीलतेचे, लाचारीचे, दुर्बलतेचे जीवनदर्शन घडते.

माणसाला ध्यास असल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होऊ शकत नाही. त्याच्या मनामध्ये एक उर्मी असते. ही उर्मी उसळून हळूहळू वर येत असते. शेतकरी मेळाव्यात सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी एकनाथ जोमदार भाषण करतो. मेळाव्याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा अशी त्याची इच्छा असते. संघर्षमय जीवन जगताना त्याने आपली तत्त्वनिष्ठा कोठेही मोडली नाही. त्याची तत्त्वनिष्ठा ज्वलंत आहे. शेतकऱ्यांसाठी जगण्याचे ध्येय त्याने निश्चित केलेले असते. नव्या विचारांना त्याने आपले शस्त्र बनविलेले असते. वैफल्यग्रस्त जीवन तो विसरून नव्या उमेदीने उभा राहतो. भाषण करतो. या विषयी लेखक लिहितो, 'बोलता बोलता त्याच्या रक्ताला उकळी फुटली. चैतन्याच्या लहरी रंध्रारंध्रातून उठताना त्याला जाणवू लागल्या. इतक्या दिवसाचं वैफल्य, उदासी पार कुठच्या कुठे पळून गेली. नानूआजा ज्या चंदनशेषाच्या शोधात जन्मभर भटकत होता, तो शुभ्रकांतीचा चंदनशेष नाग आपल्या डोळयापुढे सळसळत आहे असा त्याला भास होऊ लागला.'[४] येथे एकनाथच्या जीवनसंघर्षाचा स्फुल्लिंग स्पष्टपणे दिसून येतो. शेतकऱ्यांसाठी आपले सर्वस्व देतो. त्याचा हा लढा अयशस्वी झाला असला तरी शेतकरी वर्ग हळूहळू जागृत होऊ लागला आहे याची जाणीव वाचकांना झाल्याशिवाय रहात नाही.

एकनाथाने सर्व हालअपेष्टांवर मात करून सहनशीलता अंगी जोपासली आहे. आपल्या बुध्दिमत्तेला कोठेही डळमळू न देता वैयक्तिक आयुष्यात अपयश आले असले तरी साऱ्या गोष्टींमध्ये सोशीकता प्राप्त करून शेतकऱ्यांसाठी लढा देणे हा एक सनदशीर मार्ग पत्करून स्वत:चा तसेच समाजाचा नैतिकपणे विकास करू पाहणारा नायक म्हणून एकनाथची व्यक्तिरेखा अत्यंत प्रभावशाली वाटते. मनात एक आशावादी दृष्टिकोन ठेवून शेतकऱ्यांच्या उध्दाराकडे वळलेला हा नायक आपली जीवनमूल्ये सांभाळताना दिसतो. पारंपरिक मूल्यांबरोबर बदलत्या मूल्यविचारांचा त्याने स्वीकार केलेला आहे. आजूबाजूच्या परिस्थितीचे भान ठेवूनच तो वागताना दिसतो. कुठेही स्वार्थीपणा किंवा दिखाऊपणा करीत नाही. आजच्या मूल्यहीन विषमाधिष्ठीत

समाजव्यवस्थेत आपली जीवनमूल्ये जोपासणाऱ्या व्यक्तीला संघर्षमय जीवन जगावे लागते. ही जीवनमूल्ये जोपासता जोपासता त्याच्या मनावर येणारा ताणतणाव त्याची घुसमट मनाला सुन्न करून जाते. सदानंद देशमुखांनी एकनाथाच्या रूपाने एक हुशार, विशाल दृष्टिकोन असलेला नायक उभा केलेला आहे.

संवेदनशील, तत्त्वनिष्ठ व्यक्तिरेखा म्हणून एकनाथ ही व्यक्तिरेखा वाचकांच्या हृदयात घर करून बसते.

**❖ हृदयस्पर्शी स्त्रीव्यक्तिरेखा: -**

'बारोमास' या कलाकृतीत रेखाटलेल्या स्त्रीव्यक्तिरेखा म्हणजे ग्रामीण स्त्रीच्या जीवनसंघर्षाचा एक आलेख लेखकाने चितारला आहे. कोणतीही स्त्रीव्यक्तिरेखा एकसारखी वाटत नाही. या कादंबरीत प्रत्येक स्त्रीव्यक्तिरेखेने आपापला एक ठसा निर्माण केलेला आहे हे निश्चित. ग्रामीण भागात राहणारी ग्रामीण स्त्री येणाऱ्या अडचणींशी संघर्ष करण्याइतकी सक्षम आहे तर शहरी जीवन जगणारी स्त्री जेव्हा ग्रामीण जीवनात प्रवेश करते तेव्हा मात्र तिच्या मनाची घुसमट होत असते. शहरी वातावरणात संस्कृतीत जगलेल्या स्त्रीने ग्रामीण जीवनाशी तडजोड करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ती मनाने तिथे एकरूप होत नाही. जेव्हा दोन भिन्न विचारांच्या व्यक्ती एकत्र येतात तेव्हा त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो असे अनेकदा दिसून येते.

'बारोमास' या कलाकृतीतील स्त्री - व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना असे लक्षात येते की येथे दोन पिढयातील विचारांमध्ये खूप तफावत आहे. ही तफावत दिवसेंदिवस वाढत जाते आणि हा संघर्ष अगदी शेवटच्या टोकाला जाऊन पोहचतो. या संघर्षात एका ग्रामीण कुटुंबाची पूर्णपणे वाताहत होते हे लेखकाने इथे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

'बारोमास' या कलाकृतीतील एक ग्रामीण स्त्री ही आपल्या कुटुंबासाठी शेवटपर्यंत झगडताना दिसते तर दुसरी शहरी संस्कृतीतील स्त्री संसार अर्ध्या वाटेवरच सोडून फक्त स्वत:चा विचार करताना दिसते. या दोघींचा संघर्ष हा दोन विचारांचा आहे हे दिसून येते. काही अशिक्षित ग्रामीण स्त्रीव्यक्तिरेखा तर काही सुशिक्षित स्त्रीव्यक्तिरेखा या कादंबरीत आपणास पाहावयास मिळतात. स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना प्रथम आपण प्रमुख स्त्रीव्यक्तिरेखांचा विचार करणे आवश्यक आहे.

शेवंतामाय, अलका, ममता वारे, धुरपदाबाई, भामाबाई या प्रमुख स्त्रीव्यक्तिरेखा आहेत. मंगलाआक्का, संमिदंराआजी, अलकाची आई व दोन्ही बहिणी जया आणि तेजस्विनी, दिनकर दाभाडेची माय बहीण अंकिता, शीलावहिनी, गुंपामामी

आणि मुक्ता या सर्व व्यक्तिरेखा दुय्यम दर्जाच्या आहेत. या सर्व व्यक्तिरेखांमुळे कथानक अधिक फुलत गेले आहे.

ग्रामीण स्त्री म्हणून त्या स्त्रीला अनंत अडचणींना सामोरे जावे लागले. ही स्त्री आपल्या कुटुंबासाठी अतोनात कष्ट करत असते. आपल्या कुटुंबासाठी जिवाचे रान करते. आपल्या मुलांसाठी बऱ्याच गोष्टींचा त्याग करीत असते. घरातील सर्व कामे करून मुलांचे पालनपोषण करून आपल्या पती बरोबर शेतात खांद्याला खांदा लाऊन काम करते. आपल्या मुलाने खूप शिकावे म्हणजे त्याला नोकरी मिळेल मग आपण आनंदात सुखी जीवन जगू अशी तिची एक भोळी आशा असते पण म्हातारपणीही तिला सुख लाभत नाही. तिच्या कष्टाचीही कोणी पर्वा करीत नाही. ही फार मोठी व्यथा ग्रामीण स्त्री जीवनाची आहे. देशमुखांनी ही व्यथाच वाचकासमोर मांडली आहे. या गोष्टीचा जाणिवपूर्वक विचार करणे आजच्या काळात आवश्यक आहे.

**१. शेवंतामाय: -**

'बारोमास' ची प्रमुख नायिका म्हणून शेवंतामायची व्यक्तिरेखा महत्त्वाची ठरते. नायक एकनाथची आई शेवंतामाय ही या कलाकृतीची प्रमुख नायिका म्हणून प्रभावी वाटते. एकनाथची पत्नी अलका या व्यक्तिरेखेचे अगदी मर्यादित पानावर अस्तित्व आहे. शेवंतामायच्या तुलनेत अलकाचे स्थान फारच गौण आहे. शेवंतामाय ही व्यक्तिरेखा संपूर्ण कादंबरीभर वावरताना दिसते.

एकनाथच्या दृष्टिकोनातून शेवंतामाय म्हणजे लक्ष्मीचे दुसर रूपच होय. आईच्या सौंदर्याविषयी एकनाथ म्हणतो 'शेवंतामाय तरूणपणात काय दिसायची! लक्ष्मीच दुसर रूपच! तंग नसलेल लुंगडं. डोईभर घेतलेला पदर आपली शेवंतामाय म्हणजे आई कवितेच्या सोबत मराठीच्या पुस्तकात आईच चित्र असायच शेवंतामाय चित्रावरच्या आईपेक्षा तसूभर कमी नव्हती.'[५]

शेवंतामायच्या स्वभावाचे अनेक पदर तिच्या प्रत्येक संवादातून बोलण्यातून उलगडत जातात. कधी तिचे प्रेमळ आई तर कधी कजाग सासू तर कधी प्रेमळपणाने पतीवर रागवणारी पत्नी तर कधी पतीसाठी जीव गहाण टाकणारी त्यागशील पत्नी म्हणून तिचे स्वभावदर्शन घडते.

शेवंतामाय ही अशिक्षित आहे तरीही पोटाला चिमटा घेऊन आपल्या दोन्ही मुलांना मोठ्या आशेने शिकवते. शेवंतामाय आपल्या सासऱ्यावरही वडिलांप्रमाणे प्रेम करते. सासूच्या निधनानंतर सासऱ्याची मनापासून काळजी घेते. सासऱ्याचे मन

जपण्याचा अतोनात प्रयत्न करते त्याच्या तब्बेतीचीही काळजी घेते.

शेवंतामाय मुलांच्या शिक्षणासाठी जीवाचा आटापिटा करते. मुले शिकविण्याची तिची धडपड योग्यच होती. कारण शिक्षणाने प्रगती होते नोकरी लागते माणूस मोठा होतो. म्हणून तिचा मोठा मुलगा एकनाथ लहान असतानाच शिक्षणाविषयी गोडी त्याच्या मनामध्ये निर्माण करते. तिचे शिक्षणाविषयीचे उच्च विचार एका अशिक्षित स्त्रीचे असूनसुध्दा कौतुकास्पद आहेत.

पण हीच शेवंतामाय जेव्हा सासूची भूमिका पार पाडते तेव्हा मात्र पूर्वीपासून चालत आलेल्या परंपराप्रमाणेच तिची सुनेशी वागणूक असते. कारण तिच्या सासूनेही तिचा छळ केलेला असतो. पारंपरिक विचारांचा पगडा शेवंतामायवर बसलेला असतो. अलकासारख्या शिकलेल्या सुनेविषयी तिला कधीच आपुलकी वा आदर वाटत नाही. कारण अजूनही ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाबाबत उदासिनतेचा दृष्टिकोन दिसत आहे. म्हणूनच की काय ? तिला शिकलेल्या सुनेशी कसे वागावे हेच कळत नव्हते. आपल्या मुलाने बायकोची बाजू घेतलेली तिला आवडत नाही म्हणून ती त्याच्यावर चिडते. घरात सासू सुनेमध्ये कामावरून सतत खटके उडत असतात. येथे तिच्या सासूपणाचे दर्शन घडले आहे. शेतकऱ्यांच्या घरात अडी - अडचणी निर्माण झाल्या तर दागिने मोडावे लागतात असा तिचा एक विचार असतो कारण दागिन्यापेक्षा शेतीला तिच्या दृष्टिकोनातून अधिक महत्त्व असते. म्हणून आपल्या सूनेच्या हातातील सोन्याच्या बांगडया मोडाव्यात असा तिचा हट्ट असतो. शेवंतामायचे सारे दागिनेसुध्दा शेतात खर्ची घातलेले असतात. तिला मात्र पुन्हा कधीच ते दागिने घालायला मिळत नाहीत. शेवंतामायच्या स्वभावात फटकळपणा हा स्वभाव विशेष अधिक जाणवतो. तो तिच्या सहज बोलण्यातूनही स्पष्ट होतो. उदा. 'आरे हावगडया ते नाही ध्यानात आलं माह्या येडीच्या तुह्या बायकोले झाडायचा अन् सारवायचा नेट पडते नाई का ? बरोबर हाय गडया....'[६]

सून घरात उलट बोलू लागली तेव्हा आपल्या मुलाने मारून तिला वटणीवर आणावे अशी तिची इच्छा असते. मुलगा या गोष्टीसाठी असमर्थ आहे हे लक्षात येताच मुलावर चिडून जाते. जोपर्यंत सून घरात असते तोपर्यंत ती इकडची काडीसुध्दा तिकडे करीत नाही. अंगणात बसून शेजाऱ्यापाजाऱ्यांशी गप्पा मारत असते. पण सूनबाई रागवून जेव्हा माहेरी निघून जाते तेव्हा मात्र ती सतत कामाच्या रगाडयात स्वत:ला गुंतवून घेते. शेजाऱ्यापाजाऱ्यांशी तिचे सलोख्याचे संबंध दिसून येतात. मुगुटरावसारख्या मजुरालाही ती चांगली वागणूक देते तर शेतकाम करणाऱ्या खंडयाला आपल्या घासातला घास खाऊ घालते.

दोन लुगडी जोडून लांब लुगडे तयार करून नेसणारी शेवंतामायची ही व्यक्तिरेखा शेतकऱ्यांच्या घरातील परिस्थितीची जाणीव करून दिसते. या संदर्भात लेखक लिहितो 'शेवंतामाय पुढयात जुन्या कपडयाच गाठोडं घेऊन बसली होती आणि हातातल्या दोन लुगडयांच्या जोडावर सुईने भराभर दांड भरत होती.'[७]

आपल्या मुलांना शिक्षण देण्याची जिद्द उराशी बाळगणारी एक जिद्दी आणि प्रेमळ आईच वाचकासमोर उभी राहते. शेवंतामायचे हे रूप ग्रामीण भागातील प्रत्येक शिकणाऱ्या पोराचीच आई म्हणून प्रतीत होते.

आपल्या दोन्ही मुलांना पैशाअभावी नोकरी नाही म्हणून तिचा जीव सतत तळमळत असतो. मुलांच्या जीवनाची झालेली परवड पाहून तिचे डोळे सतत अश्रू ढाळताना दिसतात. प्रत्येक स्त्रीची अशी इच्छा असते की, मुलाचे लग्न झाले की मांडीवर नातवंडे खेळायला असावीत असे वाटणे काही गैर नाही. पण तिची ही इच्छा पूर्ण झाली नसेल तर मात्र तिचे मन सतत दु:ख करीत बसते. अशीच अवस्था शेवंतामायची झालेली दिसून येते. तिची ही तळमळ एका आजीची आहे. थोरल्या मुलाच्या लग्नाला पाच सहा वर्षे होऊन गेली तरी सून मूल होऊ देत नाही. तिला नातवंडाचे तोंड लवकर पहायचे असते पण तिची ही इच्छा कधीच पूर्ण होत नाही हे आपले दु:ख बऱ्याचदा बोलूनही दाखवते. यावरून तिची तळमळ कळून येते.

शेवंतामाय आपल्या सुनेकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने तर बघत नाही ना ? असाही एक विचार मनात येऊन जातो. त्या दोघींच्या नात्यामध्ये कुठेच गोडवा वाटला नाही किंवा एकमेकींना समजून घेण्याचा प्रयत्नच कुठे केलेला दिसून येत नाही. अलका लग्न होऊन सासरी आल्या पासूनच शेवंतामायच्या मनात अढी निर्माण झालेली असते. कारण तिला तिची भाची सून करायची होती. ही गोष्ट ती पुन्हा पुन्हा उगाळताना दिसते. अलका वरचेवर माहेरी जात असते शेवंतामायचे मन अधिकच क्लुषित झालेले असते. ती अलकाशी कधीच व्यवस्थित वागत नाही. अलका माहेरात गेली असता तिच्याविषयीचे मत स्पष्टपणे व्यक्त करते. ती म्हणते "आवो पण ती का आता नवती हाये का ? कधीच सरले नव्हाळीचे नऊ दिवस. सहा साल झाले नं लग्नाले. लेकरू बाळबी व्हत नाई वांझोटीले. गळयात लोढणं आडकलं आस्त त नखरचखर करायले चाळच नवता. किती किती हेकडपणा करती कसुण्यावाणाची. अन् मुखजडबी किती हाये. बाईच्या जातीनं कसं खुश राहावं भरल्या घरात. तवा दणदण लक्षुमी येती इले त दहादा बोलावं त एकदा हुमकारा देती. आपुन बाई बाई करावं त ढुंगणानं बोलती आपल्याशी. आपुलकीच नाई तिले कोणाची...."[८]

शेवंतामायला अलकापेक्षा तिची भाचीच सून म्हणून या घरात योग्य वाटत

होती. कारण भाची शेतात राबली असती घरात लक्ष्मी नांदली असती. पण ही गोरीगोमटी शहरातील अलका मात्र सर्वच बाबतीत अयशस्वी ठरते. खेडयातल्या पारंपरिक पध्दतीनुसार सून घरात येताच सासू काहीच काम करत नाही अशीच पध्दत शेवंतामायच्या घरीही असते. माहेरावरून सून आल्याचे कळताच परातीतील भाकरी मोडून तशीच परातीत ठेवून हात धुवून अंगणात बसून शेजारीपाजारी लोकांशी गप्पा मारायला निघून जाते. पाया पडताना अलका डोक्यावरून पदर घेत नाही म्हणून तिच्यावर रागवते. येथे तिच्या कजाग सासूपणाचे दर्शन घडते.

घरात सतत कलह होत असतो. धाकटा मुलगा आणि सून यांच्यात भांडणे होतात. मधु अलकाच्या थोबाडीत मारतो ती कायमची माहेरी निघून जाण्याचा निर्णय घेते. तेव्हा सूनेचा छळ केला म्हणून या आरोपावरून अटक होईल या भावनेनेच ती अत्यंत घाबरून जाते. आपल्या मुलाला दोष देते आपली इज्जत जाईल ही कल्पनाच तिला सहन होत नाही. या भावनेविषयी लेखक लिहितो 'आता काय करू व माय ....काय भवाडे आणले ह्या मध्यानं ....सम्द्या गावात आब जाईल आमची. लोक थुकतील आमच्या तोंडावर. हातकडया लागल्यात ....'[९]

या घटनेनंतर घरात भावा - भावामध्ये हाणामारी होते तेव्हा मात्र ती मनाने पूर्णपणे ढासळून जाते. कारण कोणत्याही आईला आपल्या मुलांमध्ये भांडणे व्हावीत असे वाटत नाही. आईला सर्व मुले सारखीच असतात. पण तिला काही सूचत नाही सूनेला माहेरी न जाण्याची विनंती करते. सूनेच्या पाया पडू लागते तेव्हा तिची अवस्था लाचार झालेल्या माणसासारखी होते. पण सून जेव्हा घराला शाप देते तेव्हा तिचे काळीज भडकते. ती म्हणते 'तुले नांदायचं नसलं त नांदू नको आगजाळ भवाने. पण माह्या घराले शाप नको देऊ मावले.'[१०] येथे तिने सुनेशी नमतेपणाची भूमिका घेतली होती पण सुनेने शाप देताच मात्र तिच्या परखड अशा स्वभावाचे दर्शन घडते.

दोन मुलांच्या दोन तऱ्हा बघून मनातून सतत हळहळ करणारी आई दिसते. एका तरी मुलाला नोकरी लागू दे म्हणून देवीला नवससायास करते. येथे तिची श्रध्दा दिसते. मोठया मुलाचा संसार तर उद्ध्वस्त झालेलाच असतो पण धाकटा मधु रात्री बेरात्री गढया उकरतो. या गढीत सापडलेली नर्तिकेची मूर्ती घरी आणलेली पाहून ती एकनाथवर रागवते. ती परत नेवून त्या जागेवर नेण्यास सांगते. या मूर्तीकडे पाहून एकनाथला म्हणते '....आंधीच आपल्या घराले पडेल आळस आंगमोडे सुचू नाई देऊन राह्यले काई. तिच्यात हिची कुठी भर पाडता.... राजाचं राज्य गेलं व्हतं हिच्यापायी'[११]

या मूर्तीने आपले घर भंग पावेल असा तिचा समज असतो. गढीतील कोणतीही ऐतिहासिक वस्तू घरात ठेवण्यास तिचा ठाम नकार असतो. येथे साऱ्या घरात तिचीच सत्ता असते ही गोष्ट लक्षात येते.

घरातील सर्व प्राण्यांवर तिचे जीवापाड प्रेम असते. दुष्काळामुळे दारातील गुरे विकण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा तिचे हृदय गहिवरून येते. गुरे नेणाऱ्या माणसांना गाय व म्हैस कसाबाला न विकण्याची विणवनी करते. या तिच्या भावनेविषयी लेखक लिहितो 'घर खाजगीवाल्यालेच इकजा बापा आमचे ढोरं. नाईत इकसाल कसायाले ? '[१२] येथे तिचे आपल्या गाई - गुरांवर असणारे प्रेम दिसून येते.

रावसाहेबासारखा कर्तबगार तरूणजावई अचानकपणे काळाने ओढून नेला आता आपल्या मुलीचे भविष्य काय ? म्हणून जिवाचा आकांत करून घेणारी शेवंतामाय काळजाला भिडते. मुलीच्या आयुष्याची राखरांगोळी झाली म्हणून जिवाचा आकांडतांडव करणारी येथे 'आई' दिसून येते. शेवंतामायचा आक्रोश पोटातील आतडेच पिळवटून टाकतो. रावसाहेबांच्या मृत्यूला कारण एकनाथ आहे असा आरोपही ती स्पष्टपणे करते. हळूहळू शेवंतामाय शरीराने आणि मनानेही ढासळत जाते. तीन मुलांच्या तीन तऱ्हा पाहून तिचे हृदय आतल्या आत तळमळत राहते. जावयाच्या खुनाचा बदला आपल्या मुलांनी बाळू सावकाराकडून घ्यावा अशी तिची अपेक्षा असते. पण मुले काहीच करू शकत नाहीत. तेव्हा तिच्या मनात मुलांबद्दल तिटकारा निर्माण होतो.

धाकट्या मधुला नोकरी लागणार या आनंदाने ती भारावून जाते मात्र पैसे भरावे लागणार आहेत हे ऐकल्यावर तिच्या काळजात धस्स होते. कारण घरात साधी फुटकी कवडी शिल्लक नसते. मधु शेती विकण्याचा निर्णय घेतो हा निर्णय शेवंताला किंवा तिच्या नवऱ्यालाही मान्य नसतो पण मधु कोणाचेच ऐकत नाही. आत्महत्या करण्याची धमकी देतो. चौकटीवर डोके आपटून घेऊ लागतो. शेवंतामाय त्याची समजूत काढते 'अरे असं नको करू रे माह्या सोन्या.... तुमच्या जीवापेक्षा मले का वावरं लय आलं का ? '[१३] कोणत्याही आईला आपल्या मुलांपेक्षा दुसरी कोणतीच गोष्ट श्रेष्ठ वाटत नाही. आपली मुलं हेच आपले सर्वस्व मानतात याचा प्रत्यय येथे येतो.

शेत सावकाराला करारी देऊन दोन लाख रूपये कर्ज काढले जाते. एक लाख रूपये देऊन दोन तीन महिने उलटून गेले तरी मधुला नोकरी लागत नाही तेव्हा मात्र ताशेरे ओढते. घराची सारी वाताहत पाहून तिचा जीव फार वैतागून जातो. मोठा मुलगा एकनाथ हा एकाकी जीवन जगत असतो. त्याचा आंधळयाचा खेळ पाहून ती

आतून हादरून गेलेली असते. आपला मधु फसविला गेला आहे हे तिला कळताच ती रडून रडून आकांत करते. उरलेले एक लाख रूपये घरात पुरून ठेवून त्या पैशाची राखण करण्याची वेळ या शेवंतामायवर आलेली असते. रात्रंदिवस पैशाची राखण करून करून तिची मनस्थिती पूर्णपणे ढासळून गेलेली असते. तिला सारी चिंता त्या पैशाची लागलेली असते. हे लाख रूपये पहिल्या मागितलेल्या संस्थेला देऊन नोकरी करण्याचा सल्ला ती एकनाथला देते पण आता त्यांचा काहीच उपयोग होणार नव्हता कारण रोजचे नियम बदलत होते. नवे नियम लागू होत होते याची जाणीव तिला नव्हती.

शेवंतामायचा नवरा एंड्रीन पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतो. त्यातून तो वाचतो पण घरातील चंद्रीमांजर मरून जाते. चंद्रीमाजरीला हात जोडून तिला तुळशी शेजारी पुरून तिची दररोज पूजा करते. शेवटी शेवंतामाय घरात घडवंचीखाली खड्डा खणून त्यात एक लाख रूपये पुरून ठेवून बिनकाळजी होते. मधु घरी येत नसल्याने त्याचीसुध्दा काळजी रात्रंदिवस करीत असते. पैसे खाणारा दलाल अपघातात मेला हे कळताच तिच्या जीवाला जरा बरे वाटते पण आता तर ते पैसे परत मिळण्याची आशाच संपली अशी चिंताही ती व्यक्त करताना दिसते. सावकाराकडे शेत गेल्यापासून सुभानरावांचे चित्त थाऱ्यावर नसते. त्यांचे मन सैरभैर झालेले असते. नवरा झोपेत काहीतरी बडबडतो त्याची दशा बघून ती भयभीत होऊन जाते. येथेच शेवंतामायचे जीवन संपल्यासारखे वाटते.

एकनाथला अटक होते. मधु रात्री बेरात्री गढया उकरत बसतो. या दोन्ही मुलांच्या आयुष्याची झालेली फरपट तिला तिच्या डोळयानी पहावी लागते हे तिचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. अचानक एक दिवस नवरा घरी आलाच नाही. रात्रभर जागून ती आतल्या आत तळमळते. रात्र सरली तरीही नवरा घरी न आल्याने तिच्या मनात शंकाकुशंका निर्माण होतात. तिच्या मनातील भावनांविषयी लेखक लिहितो 'आव बाई रातभर एकनाथचा बाप घरी नव्हता. एकनाथ गेला जेलात. अन् मध्या मढे उकरते का दफणते त्याचं त्याले माईत.... रोज राती फलाणा घरी राहे त् काई वाटेना. पण रात माह्या काळजाले घासत गेली. एक घोर नाई माह्या जिवाले हा माणूसच कुठी गेला आशीन. काई सांगनं नाई, सवरणं नाई....'[१४]

'....रातभर माहं काळीज तोंडात येऊन गुतल व्हतं. जागत्या डोळयातून जीव जाते का काय आसं वाटत व्हतं. कधी रात बाहीर न काढणारा माणूस कुठं गेला महा'[१५]

शेवंतामायच्या मनातील भावनाचे चित्रण म्हणजे एका स्त्रीमनाचे हळवे

भावचित्रण होय लेखकाने अत्यंत सामर्थ्याने पेललेले दिसते. पतीच्या मृत्यूच्या शंकेने आक्रोश करणारी शेवंतामाय साऱ्यांना जांबूळखोऱ्यातील पाण्याच्या कुंडाजवळ जाण्यास सांगते. आपण विधवा झालो या भावनेनेच ती कोलमडून पडते. तिचा हा आक्रोश हृदयाला भेदून जातो.

शेती आणि शिक्षण या दोन्ही गोष्टीही जवळ असूनसुध्दा त्या निकामीच ठरतात. या वास्तव परिस्थितीने व्यथित झालेली शेवंतामाय आजच्या सुशिक्षित बेरोजगार मुलांच्या आईचे प्रतिनिधित्व करते. एका ग्रामीण स्त्रीची वेदना काळजाच्या चिंध्या चिंध्या करणारी अशीच आहे. शेवंतामाय वरून फणसासारखी काटेरी असली तरी आतून मृदु, मधुर गऱ्यासारखी वाटते. तिचा हा आक्रोश म्हणजे सुशिक्षित बेरोजगार जीवन जगणाऱ्या तरूण मुलांच्या आईचा आणि एका शेतकऱ्याच्या पत्नीचा आहे. शेवंतामाय अनेक अडचणींना खंबीरपणे उभी राहून सामोरी जात असताना दिसते पण पतीच्या निधनानंतर मात्र ती उन्मळून पडते.

या कादंबरीचा शेवटही शेवंतामायच्या आक्रोशानेच केला आहे या विषयी लेखक लिहितो, 'शेवंतामाय उडत्या काळजाने लगबगीने जाणाऱ्या माणसांकडे पाहू लागली. पाहता पाहता पुन्हा तिच्या डोळयांतून आसवांच्या धारा लागल्या आणि जाणारे माणसं अंधुक दिसू लागले....'[१६] कादंबरीचा असा शेवट मन अस्वस्थ करून जातो. शेवंतामायच्या व्यक्तिरेखेतून स्त्री जातीच्या मनाचा गाभारा शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेवंतामायची व्यक्तिरेखा काळजात कायमचे घर करून राहणारी अशीच आहे. 'शेवंतामाय' हिच कादंबरीची प्रमुख नायिका ठरली आहे.

**२. अलका: -**

शेवंतामायच्या विचारांच्या अगदी विरूध्द टोक असणारी अशी 'अलका' ही व्यक्तिरेखा मनावर ठसा उमटवून जाणारी आहे. 'अलका' ही कादंबरीचा नायक 'एकनाथ' याची पत्नी म्हणून ही व्यक्तिरेखा लेखकाने अत्यंत वरवर रेखाटलेली आहे तिचे संपूर्ण दर्शन,मनोविश्लेषण करताना लेखकाच्या काही मर्यादा दिसून येतात.

अलका ही आजच्या काळातील स्त्रियांच्या नवविचारांशी निगडित असणारी अशी स्वाभिमानी स्त्रीव्यक्तिरेखा आहे. शेवंतामायच्या तुलनेत अलकाचे स्थान गौण वाटत असले तरी अलका आजच्या युवापिढीला जणू काही संदेश देत आहे असे जाणवते. अलकाची व्यक्तिरेखा आपण तिच्या स्वभावातून आणि विचारातून समजावून घेऊया.

प्रत्येक मुलीचे लग्नाविषयीचे एक स्वप्न असते. ती मुलगी शहरी असो वा

ग्रामीण असो तिने लग्नाविषयीच्या कल्पना लग्नाअगोदरच रंगविलेल्या असतात. सुंदर होतकरू पती घरदार माणसे चांगली सुशिक्षित सुविचाराची असावीत. याशिवाय आर्थिक सुबत्तासुध्दा असावी पण जेव्हा यापैकी कोणतीच गोष्ट तिच्या मनासारखी झाली नसेल तर मात्र तिच्या मनाची घुसमट होत राहते अशीच काहीशी अवस्था अलकाची झालेली असते.

अलकाने लग्नापूर्वी रंगविलेल्या स्वप्नांचा चुराडा ती लग्न होऊन सासरी येताच झालेला असतो कारण अलका ही शहरी वातावरणात,संस्कृतीत वाढलेली मुलगी असते. ग्रामीण जीवनाची तिला कसलीच सवय नसते त्यामुळे तिची अवस्था केविलवाणी होऊन जाते. तिच्या मनाचा कोंडमारा होतो.

'अलका' एम. एस. ई. बी. त इंजिनिअर असलेल्या एका श्रीमंताची मुलगी असते. मुलगा एम. ए. बी. एड. आहे. पुढेमागे नोकरी लागेल या आशेवर अलकाचे लग्न जमविलेले असते पण सासरी येताच तिची घोर निराशा होते. हळूहळू तिला धक्क्यामागून धक्के बसत जातात. या धक्क्यातून ती पुन्हा लवकर सावरू शकत नाही. त्यामुळे आपल्या संसाराविषयीची तिची ओढ हळूहळू कमी होत जाते. लग्न होऊन सासरी आल्यानंतर काही दिवस तिने घरदार स्वच्छ ठेवले. सारी घरची कामे केली पण हळूहळू तिला येथील जीवनाविषयी अनास्था निर्माण होते. तिच्या चेहऱ्यावर सतत मरगळ दिसू लागते. ती कोणतेच काम स्वखुशीने करीत नाही. तिची सारी मानसिकता मलीन होते. पती पत्नी मध्ये हळूहळू वैचारिक दुरावा निर्माण होतो. नवऱ्याविषयी तिचे मन क्लूषित होत जाते आणि शेवटी ग्रामीण जीवनाला घरातील माणसांना कंटाळून कायमची माहेरी निघून जाते. ती पुन्हा एकदा एकनाथला मोहाडीत दिसते. पण त्याला ओळख न दाखवताच निघून जाते.

'बारोमास' या कलाकृतीतील अलकाचे अस्तित्व काही पानापुरतेच मर्यादित असले तरी अलकाची व्यक्तिरेखा 'नव्या पिढीतील आधुनिक स्त्री' म्हणून लेखकाने साकारली आहे.

शहरी संस्कृतीचा परिणाम ग्रामीण संस्कृतीवर होताना दिसत आहे. ग्रामीण भागातील एकत्रित कुटुंब पध्दतीला तडा गेलेला दिसतो. 'कुटुंब लहान सुख महान' अशी संकल्पना आता ग्रामीण भागातही रूढ झालेली आहे. प्रत्येक जण स्वत:चा वेगळा संसार थाटू लागला आहे. भौतिक सुख हे खरे सुख अशी विचारधारा आजच्या सुशिक्षित स्त्रियांची झालेली आहे आणि हीच विचारधारा समाजात झपाटयाने वाढत चालली आहे. या विचारांमुळेच आपल्या वाड-वडिलांनी जीवापाड सांभाळलेली शेती विकून शहरात जावून काही तरी छोटा मोठा व्यवसाय करून शहरी पध्दतीनेच जीवन

जगावे आणि स्वत:चा वेगळा असा संसार थाटावा अशी अपेक्षा आजच्या समाजातील बऱ्याच स्त्रियांची असते. अलका या स्त्रियांचेच प्रतिनिधित्व करते. समाजात अशा विचारांच्या किती तरी अलका भेटतील यात शंकाच नाही.

आजची स्त्री ही आधुनिक विचारांची असली तरी तिला कौटुंबिक जबाबदारी सांभाळावीच लागते. पण अलकाच्या बाबतीत तसे घडत नाही. आजही चाळीस - पन्नास वर्षे सुखाने संसार करणारे वृध्द पती - पत्नी दिसत आहेत. केवळ शिक्षण घेऊन आपली संस्कृती विसरून स्वातंत्र्याच्या नावाखाली जगणाऱ्या स्त्रियांचीच संख्या अधिक दिसू लागली आहे.

घरच्यांसाठी स्वत:चे मन मारून काम करणे, मोठयांना आदर देणे, पती विषयी प्रेम, आत्मीयता, संसार म्हणजे पती - पत्नी यांच्या चाकावर चालणारा रथ आहे. हे समजून घेऊन पतीशी प्रेमाने वागणे, घरी आनंदाने राहणे. संसार म्हणजे तडजोड आहे हे जाणून आपल्या सासरी सुखाने संसार करणे, नि:स्वार्थीपणे पती, सासू, सासरे, दिर, नणंद, जावा यांच्याशी प्रेमाने वागणे, त्यांची कामे करणे इ. सर्व गोष्टी पन्नास - साठ वर्षापूर्वी सर्व मुली -सुना करीत असत आज मात्र शिक्षणाने मुलींना स्वावलंबन स्वतंत्र विचार करण्याची शक्ती प्राप्त झाल्यामुळे आपले घर कसे जपावे त्याऐवजी कसे मोडावे याचेच दर्शन येथे घडते.

शिक्षणाने सुसंस्कार प्राप्त होतात मग अलकाने थोडी सोशिक वृत्ती ठेवून आपल्या नवऱ्याचे, सासूचे मन जाणायला नको होते का ? हा प्रश्न काळजाला भिडतो.

अलकाच्या स्वभावाचे अनेक गहिरे रंग दिसून येतात. 'अलका' ही सुशिक्षित स्वतंत्र विचार असणारी स्त्री लेखकाने वाचकासमोर उभी केली आहे. अलकाला कठपुतळीची बाहुली बनून जीवन जगायला आवडत नाही तर तिला स्वत:चे एक वेगळे अस्तित्व निर्माण करायचे होते. स्वत:च्या पायावर खंबीरपणे उभे रहायचे होते. पण लग्न झाल्यावर मात्र तिचे अस्तित्व दबून जाते. तिच्या मनाची घुसमट होते.

ग्रामीण वातावरण घरातील माणसे विशेषत: तिची अशिक्षित असणारी सासू या दोघींमध्ये सांस्कृतिक संघर्ष निर्माण होतो. कारण शेवंतामाय ही पारंपरिक मूल्यांना धरून चालणारी सासू आहे. अलका ही नवमूल्यांचा स्वीकार करणारी सून आहे. येथे दोन स्त्रियांमधील संघर्ष नसून दोन विचारांचा संघर्ष दिसून येतो.

कादंबरीत प्रसंगानुरूप अलकाचे वेगवेगळे रूप पहायला मिळते. पत्नी सून भावजय ही नाती अलकाला सांभाळावी लागतात. पण ही सारी नाती सांभाळताना

अलका कमी पडते. ग्रामीण जीवनाशी तडजोड करून जीवन जगण्याचा अलकाने कितीही प्रयत्न केला तरी ती अयशस्वीच ठरते.

अलका ही शहरी वातावरणात वाढलेली एक सुंदर नाजूक रेखीव नाक, गोरा उजळ असा रंग, टपोरे डोळे, लांब सडक केस, सडसडीत बांधा असणारी शहरी मुलगी असते. सासरी आल्यानंतर मात्र ती मनाने आणि देहानेही सुकून जाते. सासरी आल्यावर तिला बऱ्याच वेळा तडजोड करून जीवन जगावे लागते. शेतकऱ्याच्या मुलाशी लग्न झाल्याचा तिला पश्चत्ताप होतो. तिला येथे अनंत अडचणींना सामोरे जावे लागते. शहरी सुखवस्तूत वाढलेल्या अलकाला सासरचे दारिद्रय पाहून मनात जीवनाविषयी उदासी निर्माण झालेली असते. तिला घर म्हणजे नरकवास वाटतो तसे ती स्पष्टपणे बोलूनही दाखवते.

लेखकाने आजच्या काळातील स्त्रियांची मानसिकता अलकाच्या रूपाने टिपण्याचा प्रयत्न केला आहे. शहरी आणि ग्रामीण वातावरणाचा घरातील माणसाचा परिणाम अलकाच्या मानसिकतेवर तसेच शरीरावरही होताना दिसतो. अलका माहेरी गेली की तिची मानसिकता बदलून जाते. ती मनाने आणि शरीरानेही स्वतंत्र जीवन जगताना दिसते. तिच्या शरीरावर आणि मनावरही तितकाच परिणाम होत असतो. पण सासरी येताना तिचे मन उदासीने भरून जाते. तिचा चेहरा कायम उदासीने भरलेला दिसून येतो. हळूहळू ती मनाने आणि शरीरानेसुध्दा खचत जाते. तिला आपल्या पतीबद्दल प्रेम वा आपुलकी वाटत नाही. ती त्याच्याशी कधीच मनमोकळेपणाने बोलताना दिसत नाही. ती पतीच्या सुखदु:खात सहभागी होताना कुठेही आढळत नाही किंवा पती आपल्या दु:खात सहभागी होतो की नाही याचाही विचार करताना दिसत नाही उलट पतीविषयी तिच्या मनात घृणाच निर्माण होते. पती म्हणून अस्वीकार करायलाही ती मागेपुढे पहात नाही. प्रसंगी ती त्याची जाणीवही करून देते. या भावनाविषयी लेखक लिहितो, 'लाज नाही वाटत जवळ यायला. शरीराचे चोचले पुरवायला वासना जिरवायला बायको पाहिजे अन् तिच्या मनाचा काही विचार नाही कोणत्या अवस्थेत जगते मी या कैदखान्यात माझ मलाच माहीत. स्वत: तर शंभर रूपयाची वस्तू घेऊन देत नाही. बापाने बांगडया दिल्या लग्नात त्याच्यावरही डोळे ठेवतात मेले. वावराच्या लागवडीसाठी बांगडया विकायच्या म्हणते ती महाराणी.... अन् तूही ऐकून घेतो नेभळट हलकट.... पलंगावर यायची लाज कशी वाटत नाही. माणसानं असावं पण एवढंही बेशरम नसावं....'[१७] अलकाच्या या भावना म्हणजे पतीविषयी असणाऱ्या तिरस्काराचा उद्रेक आहे असे वाटते. केवळ पतीचे प्रेम मिळाले म्हणजे सर्व सुख मिळाले असे नसून जीवन

जगण्यासाठी पैसाही महत्त्वाचा असतो याची जाणीवही ती प्रकर्षाने नवऱ्याला करून देते. अलकाचा आई न होण्याचा निर्णय ठाम असतो. येथे आधुनिक विचार करणारी स्त्री दिसून येते. कारण त्या दोघांच्या संसार अधांतरीच होता. मुलाचे संगोपन करण्याइतकी आपली अजूनतरी ऐपत नाही. या भकास गावात तिला आपले मूल वाढवायचे नाही असाही तिचा निश्चय असतो. या संदर्भात अलका म्हणते 'ह्या भकास गावात माझं बाळ उकिरडयावर खेळत आहे ही कल्पनाच सहन होत नाही मला. जगणं असलं तर ते चांगल असावं"[१८] या तिच्या बोलण्यातून एक तळमळ दिसून येते.

कदाचित अलकाला एखादं मूलबाळं झालं असतं तर आपण होऊन तिच्या सासूने, पतीने लाड केले असते. घरादारात स्वर्गसुख अवतरले असते. बाळाच्या आगमनाने आनंदीआनंद झाला असता. तिचा स्वभावही बदलला असता पण अलकाची वैचारिक बैठक इथे आड येते. तिच्या आडमुठेपणामुळे संसाराचे तीन तेरा होतात. लग्न होऊन येणाऱ्या प्रत्येक मुलीला सासरच्या माणसांशी तडजोड करून मिळून मिसळून रहावे लागते. पण अलका सासरच्या कोणत्याच माणसांशी तडजोड करू शकली नाही किंवा कोणाच्या मताशीही समरस होऊ शकली नाही. हे कटू सत्य येथे लेखकाने सांगितले आहे.

अलका ही व्यक्तिरेखा आजच्या काळाला शोभेल अशीच आहे. तिच्या स्पष्टवक्तेपणातून स्त्री जातीला एक नवा संदेश दिला आहे. असे असले तरी अलकाची ही धीटाई काहीशी शंकास्पद वाटते. घरात वाद विवाद झालेकी ती सतत माहेरी जात असते. तेव्हा तिच्या पळपुटेपणाचेही दर्शन घडते. हे लक्षात घ्यायला हवे

सासरी सर्व मनाविरूध्द गोष्टी घडत असूनही ती सर्व मानमर्यादा सांभाळून जीवन जगत असते. पण तिला हे ग्रामीण जीवन काही रूचत नाही याची खंतही मनात सलत असते. घरातील माणसांशी वागताना तिला बऱ्याच समस्याना सामोरे जावे लागते. घरात कामधंदा न करता नुसते फिरून खाणाऱ्या व गावातील चार टवाळ पोरे गोळा करून घरात घाण करणाऱ्या धाकटया दीराविषयी तिच्या मनात राग आहे. सासूशीही तिचे मतभेद आहेत नवरा शिकला असूनही आडाण्यासारखा वागतो बोलतो याचे तिला दु:ख असते.

आपले लग्न एका ग्रामीण तरूणाशी झाले आहे आणि आपले आयुष्य बरबाद झाले आहे ही भावना तिच्या मनात सतत सलत असते. म्हणून ती आपल्या दीरासाठी आलेल्या पाहुण्यांना या घरात मुलगी न देण्याविषयी सल्ला देते. आपल्या सारखेच दुसऱ्या कोणत्याच शहरी मुलीचे आयुष्य बरबाद होऊ नये अशी तिची भावना असते.

समाजात अशा अनेक घटना घडताना दिसतात. केवळ आई - वडील मुलांच्या शिक्षणाकडे बघून मुलीचे लग्न घाईने जमवितात आणि त्या मुलीचे आयुष्य बरबाद होते. याचाही बोध लेखकाने अलकाच्या विचारातून करून दिला आहे.

अलका ग्रामीण जीवनाला वैतागून वरचेवर माहेरी जात असते. तिचा नवरा काही दिवसांनी तिची समजूत घालून तिला माघारी आणतो. माहेरी आलेल्या पतीचे आदरातिथ्य करायलाही ती विसरत नाही. पत्नीचे हेही एक कर्तव्य असते म्हणजे येथे एक जबाबदार पत्नी म्हणून तिचे दर्शन घडते. अलकाला शेतीविषयी कधीच प्रेम वाटत नाही. याउलट तिच्या मते जमीनीची अर्धी वाटणी घेऊन ती विकून मोहाडीला जाऊन नोकरी करावी नाहीतर काही छोटा - मोठा व्यवसाय करून शहरात स्वत:चा वेगळा संसार थाटावा. शेतीसाठी दागिनेही न मोडण्याचा तिचा ठाम निर्धार असतो. तसे ती स्पष्टपणे बोलूनही दाखवते ती म्हणते 'अजूनही संधी गेली नाहीं वाटण्या करून घ्या. आपल्या वाटणीची जमीन विका. मोहाडीत जावून राहू. नाही नोकरी मिळाली तर कॉम्पुटर इन्स्टिटयूट चालवू. प्रेस सुरू करू किंवा झेरॉक्स, एस. टी. डी. बूथ .... बाबांच्या एवढया ओळखी आहेत त्या ओळखीचा फायदा होईलच. तुम्ही फक्त मनाची तयारी करा.'[११] अलका ही भावनेपेक्षा विचारांना अधिक महत्त्व देताना दिसून येते. शिवाय तिच्यात व्यवहारिकपणाही दिसून येतो. शेजारच्या ममता वारेकडून उसने नेलेले पैसे माघारी येताच न विसरता ते परत करते.

सासरी सासूला गाऊन घातलेला चालत नाही म्हणून सासूच्या मर्जीसाठी ती नाईलाजास्तव साडी घालते पाया पडताना डोक्यावर पदर घेते. येथे संस्कृतीचे दर्शन घडते. घरात किरकोळ कारणांने दीर भावजयमध्ये भांडण होते. दीर असणारा मधु तिच्या थोबाडीत मारतो तेव्हा मात्र तिची सहनशीलता संपलेली असते. कारण आपल्या संस्कृतीत पतीने पत्नीला मारले कोणी सहसा बोलत नाही. कारण पतीचा हक्क पत्नीवर असतो पण दीराने भावजयला मारणे म्हणजे ते समाजाच्या दृष्टीने गैर मानले जाते. एकनाथने कधीच अलकाला मारलेलं नसत आणि दीराने मारल्याने ती कायमचे सासर सोडून देण्याचा निर्णय घरातील सर्वांना सांगते. घरातील माणसाविषयी तिच्या मनातील भावनाविषयी लेखक लिहितो, 'मी आता आता फिरून तुमच्या दळभद्री घरात पाय देणार नाही. तुमचा माझा संबंध तुटला बाकी दुसरं तर काहीच देऊ शकला नाही. पण तुमच्या भावाने माझे चांगले पांग फेडले. हे तुमचे वेडपट मायबाप तो तुमचा जंगली भाऊ आणि हे शेतशिवार भणकलेलं गाव हळूहळू तुमच्यात जहरासारखं भिनत आहे. ह्या विषबाधेत तुमचा घात ठरलेला आहे. पण मी माझ तसं होऊ देणार नाही. माझा विकास करण्यासाठी माझं सुख मिळविण्यासाठी मी समर्थ आहे. ही

आपली शेवटची भेट आपण पुन्हा आता कधीच केव्हाच भेटणार नाही. हे आता सांगून ठेवते'[२०] तिच्या या बोलण्यातून जणू ती सासरी नांदायला आल्यापासूनच्या रागाच्या ज्वालामुखीचाच उद्रेक होत आहे असे वाटते. सासू तिची समजूत काढण्याचा प्रयत्न करते. तेव्हा मात्र सुनेच्या साऱ्या मानमर्यादा ओलांडल्या आहेत. सासूविषयीचे तिचे मत बोलण्यातून स्पष्ट होते. ती म्हणते, 'तू माझ्याशी शब्दही बोलू नको म्हातारे. मला सूनबाई म्हणू नको मी तुझी सून नाही आणि तू माझी सासू नाही. विसरून जा म्हणते असं म्हणायला लाज नाही वाटत ? तू असशील सरडयासारखे रंग बदलणारी. पण मी स्वाभिमानी आहे. माझे निर्णय ठाम आहेत. माझा तुम्ही अतोनात छळ केला. तुम्ही कोणीच सुखी होणार नाही. त्या कुऱ्याचे तर जन्मभर हाल होतील. त्याचा नायनाट सर्वनाश होईल हा माझा शाप आहे....'[२१] असे बोलून ती कायमची माहेरी जाते. येथे ती कोणाचेच काही ऐकून घेत नाही. येथे तिने फक्त स्वत:चा विचार केलेला आहे. पती किंवा सासरच्या माणसांचा विचार केला नाही. तिने नको असणाऱ्या संसारातून स्वत:ची सुटका करून घेतली आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्यास निघून गेली. तिला स्वत:च्या पायावर उभे राहून नवीन काहीतरी करून स्वत:ची अशी एक वेगळी ओळख समाजाला करून द्यायची होती. असा निर्धार तिच्या बोलण्यातूनच स्पष्ट होतो.

इथे लेखकाला ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविताना सर्वच ठिकाणी निराशा दिसते. निराशावादी सूर धरून कादंबरी शोकांत करायची या दृष्टिकोनातून अलकाचे व एकनाथचे संसार सुखाचे स्वप्न भंगलेले दाखविले आहे असे वाटते. दोघेही सुशिक्षित होते. दोघांनी मिळून एका विचाराने एखादे विधायक काम हाती घेतले असते तर दोघांचेही सूर जुळले असते. उदा. लहान मुलांच्या शिकवण्या घेणे, खेडयातील स्त्रियांचे प्रबोधन करणे इ. सामाजिक कार्य करून अलकाला स्वत:चे स्थान निर्माण करता आले असते. व्यक्तिमत्त्व फुलविता आले असते. आजसुध्दा ग्रामीण भागात सुशिक्षित मुली आपल्या घरी गुण्यागोविंदाने एकत्र कुटुंबात राबताहेत. सुखाने संसार करत आहेत. पण लेखकाने सर्वच व्यक्तिरेखा नकारात्मक विचारांच्या रेखाटल्या आहेत असे वाटते. खेडयात दु:ख असते, शेतीची वाताहत होते म्हणून कोणी घर सोडून जात नाही. येणाऱ्या प्रसंगांना धैर्याने तोंड देण्यात या व्यक्तिरेखा कमी पडल्या आहेत.

एक अशिक्षित ग्रामीण स्त्री फक्त 'चूल आणि मूल' या गोष्टींचाच विचार करताना दिसते तर अलकासारखी सुशिक्षित स्त्री या गोष्टीला दुय्यम स्थान देते. आपल्या करियरकडे लक्ष देण्याकडे तिचा अधिक कल असतो. अलकाच्या या

निर्णयातून असेच स्पष्ट होताना दिसते. दोन ध्रुवांची दोन भिन्न विचारांची टोके एकत्रित येत नाहीत पण दोन्ही टोके एकत्रित आली तर संसारामध्ये मोठी दरी निर्माण होते. पती - पत्नीमध्ये एकोपा निर्माण होत नाही. हळूहळू दुरावा निर्माण होतो आणि त्यांची कायमची ताटातूट होऊन दोघांच्या संसाराचा रथ मोडून पडतो. अशीच स्थिती एकनाथ आणि अलकाच्या संसाराच्या रथाची झाली आहे. त्यांचा हा रथ निम्म्या वाटेवर मोडून पडतो आणि त्यांच्या संसाराची एक शोकांतिका होते. ही शोकांतिका काळजाला भगदाड पाडून जाते.

अलका ही नंतर फक्त एकनाथच्या आठवणीत असते. कादंबरीच्या जवळजवळ शेवटच्या भागात एकनाथला अलकाचे ओझरते दर्शन होते. एकनाथ तिला हाक मारतो पण अलका एकनाथ दिसताच काहीशी घाबरून जयाचा हात घट्ट पकडून ओळख न दाखवताच तेथून निघून जाते.

शेवंतामाय आणि अलका या दोन्ही व्यक्तिरेखांचा अभ्यास करता असे लक्षात येते की एक ग्रामीण स्त्री कितीही संकटे आली तरी खंबीरपणे उभी राहून त्या संकटाशी झगडताना दिसते तर एक अलकासारखी शहरी स्त्री मात्र ग्रामीण जीवनाशी संघर्ष करण्यास असमर्थ ठरते. याची तिला जाणीव होताच संसाराचे सारे पाश तोडून ती स्वत:ला घडवायला निघून जाते. येथे तिने केवळ स्वत:चाच विचार केलेला दिसून येतो.

सासू आणि सून यांचं नातं बहुपदरी असते या नात्यामध्ये कधी आंबटपणा कधी तिखटपणा तर कधी खारटपणा असतो. त्याचबरोबर कडू गोड अनुभव येत असतात. कुटुंबाची शांतता सुख समाधान घराची प्रगती या साऱ्या गोष्टी या नात्यावरच बऱ्याचश्या अवलंबून असतात. या नात्यामध्ये फक्त कडूपणाच असेल तर मात्र घराला तडा गेल्याशिवाय किंवा ते कुटुंब पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहत नाही. याचे द्योतकच या दोन व्यक्तिरेखा आहेत.

या दोन व्यक्तिरेखाबरोबर 'बारोमास' या कादंबरीत आणखी काही स्त्रीव्यक्तिरेखा आलेल्या आहेत. प्रत्येक स्त्रीव्यक्तिरेखा आपापला स्वत: चा असा एक ठसा निर्माण करते. असाच स्वत:चा वेगळा ठसा निर्माण करणारी ममता वारे ही व्यक्तिरेखा अधिक भावून जाते.

**३. ममता वारे : -**

नावाप्रमाणेच ममताळू असलेली 'ममता वारे' ही व्यक्तिरेखा एकनाथच्या शेजारी राहणारी अलकाची मैत्रीण म्हणून अधिक प्रभावी वाटते. ममता वारेची

व्यक्तिरेखा एकनाथच्या निवेदनातूनच अधिक फुलते. ममता वारे ही प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे. तिचा नवरा ग्रामसेवक आहे. एकनाथच्या घराशेजारीच तिचा बंगला असतो.

ममता वारेचा पती दत्ता वारे हे दोघेही नोकरी करीत असल्याने खेडयात राहूनसुध्दा शहरी जीवन जगत असतात. ममता वारेचं घर म्हणजे गल्लीतला एक पॉश बंगला असतो. आर्थिक परिस्थिती उत्तम असल्याने त्यांचे राहणीमान उच्च दर्जाचे असते. पण तरीही या दांपत्याला एक दु:ख असते ते म्हणजे लग्न होऊन दहा वर्षे होऊन गेलेली असतात तरीही त्यांना मूलबाळ झालेले नसते. तिच्या चेहऱ्यावरती सतत हसू दिसत असले तरी मनात मात्र दु:ख आहे. पण ते दु:ख ती आपल्या हसण्यावारी बोलण्यातून व्यक्त करते. ममता वारे म्हणते, 'पण असं नेहमी जीवघर खाली करू नाही. मी दहा वर्षापासून तरसते तर मला काही नाही.'[२२] येथे तिची मुलाविषयीची तळमळ दिसून येते.

अलकाला वेळोवेळी मदत करते एकनाथलाही बोलण्यातून समज देते 'आम्ही राहतो. पण आमचं अन् तुमचं वेगळं आहे. आम्ही खेडयात राहत असलो तरी शहरातल्यासारखं जगतो.' या तिच्या बोलण्यातून सर्व तरूण पिढीला समज दिला आहे. अलका सासरी असेपर्यंत तिचे जाणे येणे चालू असे पण जेव्हा ती कायमचे सासर सोडून जाते तेव्हा मात्र ममता वारे हिच्या वागण्या बोलण्यात अंतर पडते. एकनाथला तिचे शरीर म्हणजे मोहक हसू वाटे. एकनाथला तिच्याविषयी आकर्षण वाटे. तिचे वर्णन तो 'मृगनयनी डोळयांतून हसते. कमानी ओठातून हसते. गालावरच्या खळीतून हसते. लांबसडक केसातून हसते. हिचं सारं शरीर म्हणजे मोहक हसू.'[२३] तिचं हे हसू अंतर्मनातून असते की वरवरचे असते हेसुध्दा कळत नाही. पण अलका माहेरी गेल्यापासून ती त्याच्याकडे बघून पुन्हा कधीच हसली नाही किंवा त्याच्याशी बोललीही नाही. ममता वारेची व्यक्तिरेखा नंतर मात्र कुठेही वावरताना दिसत नाही.

**४. धुरपदाबाई: -**

धुरपदाबाई ही व्यक्तिरेखा वेड लागलेल्या तरूण मुलाची आई म्हणून चित्रित केली आहे. 'धुरपदाबाई' ही मोलमजुरी करून पोट भरणारी एक ग्रामीण स्त्री आहे. ती एक विधवेचे जीवन जगणारी गरीब स्त्री आहे. तिला कोणाचाही आधार नसतो. ज्या मुलाला ती म्हातारपणाचा आधार मानते तोच तरणाताठा मुलगा वेडा होतो आणि तिच्या आयुष्यात अंधार पसरतो. मोलमजुरी करून मुलाला बी. एड. पर्यंत शिक्षण दिलेले असते. मुलगा विनाअनुदानित शाळेवर तीन वर्षे बिनपगारी नोकरी करीत

असतो. त्या शाळेला शासन मान्यता येते तेव्हा कायम करून घेण्यासाठी संस्थाचालक एक लाख रूपये डोनेशन मागतात. डोनेशन भरण्यासाठी तिच्याकडे पैसे नसतात आणि शेतही नसते. शेवटी मुलगा पैशाच्या आशेने 'सोनेरी टोळी' त सामील होतो आणि एका रात्री अचानकपणे हाडाचा सापळा त्याच्या अंगावर पडतो आणि त्या मुलाच्या मेंदूवर परिणाम होतो. तो वेडयासारखे वागू लागतो. मधुने आपल्या मुलाला वेडे केले आहे याचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी ती मधुच्या घरी येते. अंगारा, प्रसाद डॉक्टर करूनही मुलाला काहीच फरक पडला नव्हता. मुलाच्या या अवस्थेकडे बघून तिचं भान हरपून गेले होते. हे अगदी सहजपणे लक्षात येते.

एकनाथच्या दारात तिने मोठा आकांत मांडला होता. तिचा हा आकांत हृदय हेलावून टाकणारा असा आहे. तिच्या भावना अशा शब्दात व्यक्त झाल्या आहेत, 'आरे पण तुह्या भावानं माझ्या जानजवान पोराचा घात केला नं ? नवरा मेल्यावर पोटाले चिमटा घेऊन म्या त्याले लहानाचं मोठं केलं. शिकवलं सवरलं अन् भर जवानीत त्याचे आसे हाल केले तुमी लोकायनं ? माही म्हतारपणाची काडी मोडून टाकली आधाराची'[२४] आपल्या मुलाच्या जीवनाची झालेली परवड पाहून तिचा जीव हळहळताना दिसून येतो. ज्या मुलाला ती आपला आधार समजते त्याच मुलाचा आधार तिला होऊन जीवन जगावे लागते. मुलाच्या या अवस्थेला जबाबदार असणाऱ्या मधुला ती शाप देते 'मी रांडमूंड बाई एवढाच एक आधार व्हता. त्यालेबी तुपल्या भावानं काय करणी कवटाळ केली का जणू ! त्याचं कधी बरं व्हनार नाई. हळाकळा लागतील माझ्या रंडक्या बाईच्या ....'[२५] मुलासाठी तिचा जीव तीळ तीळ तुटतो पण तिचा नाईलाज असतो. कारण मुलाला चांगल्या दवाखान्यात नेण्यासाठी तिच्याजवळ पैसे नसतात. मुलासाठी तिने एवढया खास्ता काढलेल्या असतात. रात्रंदिवस ती मुलाच्या शिक्षणासाठी राबते कारण तिने आपल्या मुलाला नोकरी लागेल अशी वेडी आशा उराशी बाळगलेली असते. पण या आशेची सारी दुर्दशा होते. मुलाला एवढं शिकवलं म्हणून ती पश्चात्तापही करते. या तिच्या पश्चात्तापाविषयी लेखक लिहितो, 'हकनाक म्या दिलप्याले शिकोलं. त्यांच्या शिक्षेणापायी हाडाचे कांडं केले. नस्तं शिकालं अन् लहानपणीच कोणाच्या साला महिण्यानं ठेवलं आस्तं त आतालोक त्याले लेकरू झालं आस्तं. तिघाय मिळून दुखात कमावलं आस्त, अन् सुखात खाल्लं आस्तं ....'[२६]

लेखकाने गरिबीतून शिकलेल्या एका गरीब मुलाची आणि त्याच्या आईची झालेली परवड येथे चित्रित केली आहे. आजच्या काळात शिक्षण आणि नोकरी या दोन्ही गोष्टी गरीबासाठी शापच ठरत आहेत. आजच्या शिक्षण क्षेत्रात लाचखाऊपणा

बोकाळलेला आहे. शिक्षणक्षेत्राचे बाजारीकरण झाले आहे. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्राला शिक्षणसम्राटांनी सर्वस्वी अपवित्र करून टाकले आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सारा पैशाचाच बाजार झाला आहे. कमी गुण मिळालेल्या श्रीमंत तरूणाला उच्च शिक्षण प्राप्त होते पण गरीब तरूणाला पदवीपर्यंतचेही शिक्षण घेता येत नाही. शिक्षणसम्राटाच्या दृष्टिकोनातून केवळ आर्थिक मोबदलाच अधिक महत्त्वाचा असतो किंबहुना लाच देऊन शिक्षण घेणारा विद्यार्थी त्या नोकरीस अपात्र असला तरी फारसा फरक पडत नाही. या समस्येवर लेखकाने या व्यक्तिरेखेतून प्रकाश टाकलेला दिसून येतो.

नोकरीच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. काही वर्षे फुकट नोकरी करावी लागते. वेळेवर पगार मिळत नसतो. एक ना एक दिवस आपणास कायमस्वरूपी नोकरी मिळेल या आशेने गुलामासारखे राबणारे शिक्षक समाजामध्ये पहावयास मिळतात. शिवाय त्याच्या नोकरीवर सतत टांगती तलवार असते या सर्व घटना सुशिक्षित बेकार तरूणांना नाउमेद करणाऱ्या अशाच आहेत.

**५. भामाबाई: -**

'भामाबाई' ही अशिक्षित ग्रामीण स्त्री म्हणून वाचकासमोर येते. भामाबाईची व्यक्तिरेखा कादंबरीत अधूनमधून डोकावताना दिसते. ती एकनाथच्या शेजारीच राहते. तिला मुले भरपूर असावीत असे तिच्या बोलण्यातून सूचित होते. रात्रंदिवस तिची पोरांभोवती बडबड चालू असते. भामाबाईच्या घरातल्या टिनपऱ्यावर गावातील फिरस्ती कुत्री एकत्रित येऊन भुंकतात तेव्हा ती त्या कुत्र्यांना रात्रभर शिव्या देत असते. सकाळी तिला कुत्र्यांनी केलेली घाणही काढावी लागते. तेव्हा ती म्हणते, 'घरात पोरायचे अन् घराबाहेर कुत्र्यांचे ढोबरं उचलताना महा जल्म चाल्ला.'[२७] तिचे हे बोल वैतागून असतात की अभिमानाचे याचा उलगडा मात्र कधीच होत नाही. ही भामाबाई वेळोवेळी मदतीस धावून जाणारी अशी स्त्री आहे. भामाबाईचे शेवंतामायशी नातं हे सुनेचं आहे. शेवंतामायशी सुनेच्या मर्यादेने वागताना भामाबाई दिसते.

**६. मंगलआक्का: -**

एकनाथ याची बहीण मंगलआक्का असते. तिची व्यक्तिरेखा लेखकाने अगदी थोडक्यात चित्रित केली आहे. सावकारी कर्जाच्या पाशात अडकलेला तिचा पती आत्महत्या करतो आणि ऐन तारूण्यात ती विधवा होते. पती निधनानंतर सासरची सारी जबाबदारी तिच्या एकटीवर पडते.

७. गुंपामामी आणि मुक्ता: -

'गुंपामामी' ही एकनाथची मामी म्हणजे बळीमामाची बायको असते. आपल्या मुलीचे लग्न एकनाथशी व्हावे असे तिला वाटत असते पण एकनाथ मुक्ताला नकार देतो म्हणून गुंपामामीचा राग एकनाथवर असतो. गुंपामामी ही मोलमजुरी करून पोट भरणारी स्त्री आहे. आपल्या आईबरोबर रोज मोलमजुरी करणारी मुक्ता ही अशिक्षित असते. शिकलेल्या एकनाथशी आपले लग्न व्हावे अशी तिची इच्छा असते. पण एकनाथने नकार दिल्यावर तिचे लग्न पाच एकर शेती असणाऱ्या मुलाशी होते. पण नवरा दारूडा असतो. सारी शेती विकून टाकतो. तिच्या संसाराची सारी परवड होते. या विषयी लेखक लिहितो, 'तिच्या पाच एकर शेती असणाऱ्या नवऱ्याच्या संसारात ती चिपाड झाली.'[२८] तिच्या संसाराची झालेली परवड गुंपामामीला डोळयांनी पहावी लागते. याला कारण एकनाथ आहे असा आरोपही ती एकनाथवर करते. मुक्ता मोलमजुरी करून संसार चालवत असते पण नवऱ्यानं घरावरचा टिनपत्राही विकलेला असतो. त्यामुळे तिच्या घरातील भाकरी वानंर चोरून नेतात. मुक्ता जेव्हा आपल्या मुलांना घेऊन माहेरी निघून येते तेव्हा एकनाथला ती भिकारीण वाटते. अशिक्षित असणारी मुक्ता आपल्या मुलांना घेऊन व्यसनी नवऱ्या सोबत गरिबीत संसार करीत असते. पण सुशिक्षित असणारी अलका सुशिक्षित निर्व्यसनी नवऱ्यासोबत संसार करण्यास असमर्थ ठरते. येथे अलकापेक्षा मुक्ताच कितीतरी पटीने श्रेष्ठ ठरते.

मुक्ता ही व्यक्तिरेखा कादंबरीत फारशी उठून दिसत नाही. केवळ एकनाथच्या निवेदनातून तिचा उल्लेख येतो.

८. अलकाची आई आणि तिच्या दोन बहिणी जया आणि तेजस्विनी: -

'बारोमास' या कलाकृतीतील या तिन्ही व्यक्तिरेखा इतर व्यक्तिरेखापेक्षा फार वेगळया आहेत. या तिन्ही व्यक्तिरेखा अलकाशी संबंधित अशा आहेत. या व्यक्तिरेखातून लेखकाने शहरी संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. या तिन्ही व्यक्तिरेखा आधुनिक विचारांच्या आहेत. आपली मोठी मुलगी अलका हिला ग्रामीण भागात शेतकऱ्याच्या घरात दिली म्हणून तिच्या आईला पश्चात्ताप होतो. कारण कोणत्याच आईला आपल्या मुलीचे वाटोळे व्हावे असे वाटत नाही.

अलकाची दुसरी बहीण 'जया' ही कॉलेजमध्ये शिकत असते ती आजच्या कॉलेजमधल्या युवतीचे प्रतिनिधित्त्व करताना दिसून येते. तिच्या स्वभावात फटकळपणा दिसून येतो. आपल्या मोठया मेहुण्याला खेडवळपणाचे टोमणे मारून मारून शहरी आणि ग्रामीण संस्कृतीतील फरक दाखवून देत असते. दुसऱ्यांचा अपमान

करणे, टोमणे मारणे म्हणजे आधुनिकता का ? मोठया मेहुण्याला अपमानित करताना मनाला कुठे तरी लाज, शरम वा खंत वाटत नाही का ? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. 'तेजस्विनी' ही अलकाची धाकटी बहीण. ती शाळेत शिकत असते. ती लहान असूनही मेहुण्याला अपमानास्पद बोलते. तिला या बोलण्यात काहीच गैर वाटत नाही उलट जोक केला समजावं असे स्पष्टपणे बोलून दाखवते. या तिन्ही व्यक्तिरेखा आधुनिक काळातील स्त्रियांचेच विचार मांडताना दिसून येतात. शिक्षणाचा गर्व करणाऱ्या या तिन्ही व्यक्तिरेखा थोडयाशा अविचारी वाटतात.

**९. दिनकर दाभाडेची माय व अंकिता: -**

'दिनकर' हा सेट पास झाला असून त्याला नोकरी लागत नाही म्हणून त्याची आई दु:खी आहे. शिवाय 'अंकिता' ही लग्नाला आलेली तिची देखणी मुलगी असते. तिच्या लग्नासाठी पैसे नाहीत. म्हणून तिचे लग्न करता येत नव्हतं. मुलाला नोकरी नसल्याने समारंभात, लग्नप्रसंगी, बँडपार्टीमध्ये सामील झालेला असतो. एवढे शिकून नोकरी मिळत नाही त्यापेक्षा मुलाला शिकवलं नसतं तर बरे झाले असते असा विचार आईच्या मनात येतो. एका सुशिक्षित बेरोजगार जीवन जगणाऱ्या तरूण मुलाची आई म्हणून तिचा जीव तळमळताना दिसतो. ही तळमळ शिक्षणाविषयी अनास्था निर्माण करते. पैसा आणि वशिलेबाजी असणाऱ्या तरूणाचाच आजच्या काळात निभाव लागतो अन्यथा तोही बेरोजगारीचे जीवन कंठत असतो. ही वस्तुस्थिती आहे.

**१०. संमिदराआजी: -**

संमिदराआजीची व्यक्तिरेखा कादंबरीत निवेदनातून एकदाच येते. पण ही व्यक्तिरेखा मनाला अस्वस्थ करून जाते. तिला मुलगा नव्हता. एक मुलगी असते. या मुलीचा मुलगा रमेश काकडे याला दत्तक घेते. तो वीस एकराचा मालक होतो आणि त्याची बुध्दी पालटते. शेती विकून जीप नाहीतर ट्रक घेतो असं तो आजीला सारखा बोलत असतो. पण संमिदराआजी त्याला शेत विकण्यास ठाम विरोध करते. गावातल्या काही जाणकार माणसांना नातवाची समजूत काढायला सांगते. पण हा नातू दारू पिवून या माणसांनाच शिव्या देतो आणि एका रात्री संमिदराआजी खिचडी खाऊन झोपली ती पुन्हा उठलीच नाही. गावात तिच्या मृत्यूविषयी चर्चा होते. नातवानेच विष घालून तिला मारले पण पोलीसतक्रार करूनही उपयोग नव्हता. कारण त्याच्या बायकामुलांचे हाल होतील शिवाय म्हातारीचं वयही झाले होते. नातूचं आजीचा काळ बनतो. संमिदराआजीचा जीव पैशासाठी गेला हे सत्य नाकारता येत नाही. समाजात अशा कितीतरी भयानक घटना घडत असतात. पैशासाठी माणसाचा जीवही जातो याची प्रचिती संमिदराआजीच्या व्यक्तिरेखेतून येते.

## ११. शीलावहिनी: -

शीलावहिनीच्या व्यक्तिरेखेतून विचारी स्त्रीचे दर्शन घडते. शीलावहिनी ही कृषिनिष्ठ पुरस्कार मिळालेले शेतकरी 'नरूभाऊ' यांची पत्नी म्हणून कादंबरीत येते. शेतकऱ्याची पत्नी असूनही शेतीविषयी तिच्या मनात उदासिनता निर्माण झालेली असते. म्हणूनच ती आपल्या मुलाला शिक्षणासाठी शहरात ठेवते. कारण कोणत्याही आईला आपल्यावर जी वाईट वेळ आली ती आपल्या मुलांवर यावी असे वाटत नाही. म्हणूनच ती मुलाच्या भवितव्याचा विचार करणारी एक पाऊल पुढे टाकणारी स्त्री येथे दिसून येते. मुलाच्या शिक्षणासाठी शेत विकण्याचीही तिची तयारी असते. मुलगा शहरातच रहावा अशी तिची मनापासून इच्छा असते.

या स्त्री व्यक्तिरेखांशिवाय आणखी काही स्त्रीव्यक्तिरेखा कादंबरीमध्ये पुसटशा अशा येऊन जातात. नायकाच्या निवेदनातून त्यांचा उल्लेख आला आहे. बय, सुदामा शेलाराची पत्नी, प्रवासात भेटलेली एक अनोळखी स्त्री, सोनल, शारदाकाकू, संमिदरामावशी, बनाबाई, कलाबाई, शंकर तात्याची पत्नी, गोकुळाबाई, म्हादूआण्णची बायको कावेरी, शांता, सोनाबाई, संपत तनपुरेची आई द्वारकाबाई या स्त्रीव्यक्तिरेखा फक्त नावा पुरत्याच कादंबरीत उल्लेखल्या आहेत.

लेखकाने काही स्त्रीव्यक्तिरेखा ग्रामीण तर काही शहरी व्यक्तिरेखा उभ्या करून ग्रामीण आणि शहरी संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. कादंबरीतील प्रत्येक स्त्रीव्यक्तिरेखा आपापल्या जागी योग्यच आहे. शहरी जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा विचाराने एक पाऊल पुढे गेल्यासारख्या आहेत. तर ग्रामीण स्त्रीव्यक्तिरेखा मात्र तेथे रोवून बसल्यासारख्या आहेत.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे अंतर्मनच येथे बोलत आहे असे वाटते. लेखकाने ग्रामीण स्त्रीमनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. प्रत्येक स्त्री व्यक्तिरेखा वेगवेगळया रूपात साकारलेली आहे.

शहरी स्त्री व्यक्तिरेखेपेक्षा ग्रामीण स्त्री व्यक्तिरेखा अधिक हृदयस्पर्शी आहे. कारण प्रत्येक ग्रामीण स्त्रीचे दु:ख तिच्या डोळयातील अश्रूच्या धारा सांगतात. ग्रामीण स्त्री व्यक्तिरेखा काळजाच्या चिंध्या चिंध्या करणाऱ्या अशाच आहेत. ग्रामीण भागातील स्त्रीमनाचे लेखकाला झालेले आकलन हे मनाला विचारप्रवृत्त करणारे आहे.

## ❖ संघर्ष करण्याचे बळ आणि धडपड: -

प्रत्येक माणसाला जीवन जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष करण्यासाठी लागणारे मानसिक बळ त्याचबरोबर शारीरिक बळही महत्त्वाचे असते. हे

बळ माणसाला मिळालेली परमेश्वराचीच देणगी असते. म्हणून तो जगण्यासाठी सतत धडपडत असतो. मानवी जीवनच मुळी संघर्षमय आहे.

माणूस जन्माला आला की त्याचा जीवन संघर्ष सुरू होतो. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे आयुष्य म्हणजे एक संघर्ष असतो. तो संघर्ष अनेक प्रकारचा असतो. हा संघर्ष करीतच माणूस आपले आयुष्य जगत असतो पण त्याचा हा संघर्ष अयशस्वी झाला तरीही तो जगण्यासाठी मानसिक बळ टिकवण्याचा अटोकाट प्रयत्न करीत असतो. ही जगण्याची त्याची धडपड म्हणजे एक लढाईच असते. 'बारोमास' या कलाकृतीतून प्रत्येकाचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष आणि धडपड याचेच चित्रण केले आहे. संघर्ष हा कथानकाचा केंद्रबिंदू असतो. कादंबरीचे आकर्षण, कौशल्य, रचनातंत्र यावर अवलंबून असते. संघर्ष हा विविध स्वरूपाचा असतो. संघर्ष या घटकाविषयी बालशंकर देशपांडे लिहितात, "संघर्ष हा मनुष्य व बाह्यविरोधी शक्ती यांच्यातला असेल, मनुष्या - मनुष्यातला असेल, मनुष्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्यातला असेल. मनुष्य आणि नियती यांच्यातला असेल किंवा त्यांच्याच अंतस्थ विचार विकारामधला असू शकेल.... आणि याच शाश्वत सत्यावर कादंबरी सृष्टीची उभारणी झालेली असते."[२९]

'बारोमास' या कलाकृतीत शेतकऱ्यांच्या जीवनाचा संघर्ष, तरूण पिढीचा विविध पातळयांवर चाललेला संघर्ष, जुनी पिढी आणि नवी पिढी यामधील संघर्ष, कौटुंबिक संघर्ष, सांस्कृतिक संघर्ष, तर कधी मानवी मनाचा संघर्ष स्वत:चा स्वत:शी चाललेला मानसिक संघर्ष लेखकाने चित्रित केला आहे.

ग्रामीण जीवन जगताना, ग्रामीण व्यक्तीला अनेक संघर्षांना सामोरे जावे लागत असते. 'शेतकरी' म्हणून जन्माला आला की त्याचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष म्हणजे एक सत्त्वपरीक्षाच असते. कारण शेतकरी हा असा एकच वर्ग आहे की त्याच्या पुढे समस्याच समस्या उभ्या राहत असतात. या अनंत समस्यांशी संघर्ष करून त्याला जीवन जगावे लागते. त्याचा प्रथम संघर्ष असतो तो निसर्गाशी. कारण निसर्गाच्या कृपेवरच त्याचे जीवन अवलंबून असते. निसर्गाची अवकृपा झाली तर शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाल्याशिवाय रहात नाही. निसर्गाच्या अवकृपेवर मात करून शेतकरी काही थोडे फार उत्पन्न काढतो. त्यालाही दर मिळत नाही. त्यामुळे आर्थिक टंचाई निर्माण होते. आर्थिक टंचाई निर्माण झाल्याने कौटुंबिक संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष विकोपाला जाऊन सारे कुटुंबच उद्ध्वस्त होऊन जाते.

शेतकऱ्यांने निसर्गाशी कितीही संघर्ष केला तरीही निसर्गच श्रेष्ठ ठरतो. शेतकरी जगण्यासाठी केविलवाणी धडपड करताना दिसतो. येणाऱ्या आपत्तींना तोंड

देण्याचा अटोकाट प्रयत्न करीत असतो तरीही तो अयशस्वीच होतो. जीवनात आलेले हे अपयश तो विसरू शकत नाही. तो जीवनाविषयी नैराश्यवादी होतो आणि आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. आत्महत्या करून स्वत:चे जीवन संपवून टाकतो.

सुशिक्षित तरूण पिढीचा विविध पाताळयांवर संघर्ष सुरू असतो. या तरूणपिढीचा प्रामुख्याने आपल्या विषमाधिष्ठीत असणाऱ्या जटिल समाजव्यवस्थेशी संघर्ष सुरू असतो. या जटिल समाजव्यवस्थेच्या चाकात ही हुशार तरूणपिढी भरडली जात आहे. आजची युवा पिढी दिशाहीन होत आहे. गैरमार्गाचा अवलंब करून भरकटतांना दिसते. समाजात या पिढीला काहीच किंमत उरलेली नसते. समाज त्यांना चांगली वागणूक देत नसतो. पैशाअभावी नोकरी मिळत नाही म्हणून पैसा मिळविण्यासाठी मधुसारखे अनेक युवक गैरमार्गाचा स्वीकार करतात. हा पैसा मिळविण्यासाठीचा त्यांचा हा गैरमार्ग असला तरी येथेसुध्दा एक संघर्षच दिसून येतो. केवळ पैशासाठी रात्री - बेरात्री त्यांचे शारीरिक कष्ट तसेच मानसिक बळ आणि त्याची जगण्यासाठी चाललेली अविश्रांत धडपड विचार करायला भाग पाडते.

कादंबरीचा प्रमुख नायक 'एकनाथ' याचा पावलोपावली संघर्ष चाललेला दिसून येतो. एकनाथ कधी कौटुंबिक तर कधी सामाजिक संघर्षामध्ये अडकलेला दिसून येतो. एकनाथ हा सतत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करीत जीवन जगताना दिसतो. तरीही शेवटी पराभूत होतो. त्याच्या जीवनाची झालेली होरपळ आपले हृदय रक्तबंबाळ करते.

गरीब परिस्थितीमध्ये तो पदवीपर्यंत शिक्षण घेतो. नोकरीसाठी सात - आठ वर्षे संघर्ष करीत असतो. पन्नास मुलाखती देऊनसुध्दा नोकरी लागत नाही. शेवटी नाईलाजास्तव शेती व्यवसायाकडे वळतो. पदवीधर शिक्षण घेऊनसुध्दा नोकरी मिळत नाही. शेवटी शेतकऱ्यांच्या मुलांनी कितीही शिक्षण घेतले तरी नोकरी मिळणार नाही अशी एक भावना आजच्या ग्रामीण तरूण पिढीच्या मनात निर्माण झाली आहे. 'एकनाथ' हा आजच्या सुशिक्षित युवापिढीचे प्रतिनिधित्व करताना दिसून येतो. सुशिक्षित असूनही शेतात राबताना एकनाथ हा ग्रामीण होऊन जातो. त्याच्या मनाची व्यथा व्यक्त होताना दिसते. "मी आता सोडपिच्छाच केला अर्ध शतक पूर्ण झालं आता कुठं शतक गाठत बसता. भाडयाची त सोय पाह्यजे. सिनियर, ज्युनिअर हायस्कूल सगळीकडं जाऊन शेवटी उदास होऊन सांजोळात परत या, मी तर मनाला असा सांगण्याच्या तयारीत आहे की बाबा मना, तू समज आपण काही शिकलोच नाही. खंडयाच आहेस तू दुसरा. म्हणून तसेच कपडे, पायजमा, सदरा तसचं बोलणं तुले.... मले असला नसला शिक्षणाचा मुलामा खल्डून शंभर टक्के एकशे एक टक्के

गरामीन व्हायचं आता आपल्याले'[३०] एकनाथचा संघर्ष येथपर्यंतच थांबत नाही तर पती - पत्नी मध्ये वैचारिक संघर्ष निर्माण होतो आणि पती - पत्नीमध्ये दुरावा निर्माण होतो. दोघांमध्ये विचारांची प्रचंड अशी दरी निर्माण होते शेवटी त्याची पत्नी त्याला कायमचे सोडून जाते आणि त्याच्या कुटुंबाची पूर्णपणे वाताहात होते. पत्नीच्या विरहाने त्याच्या मनाचा स्वत:शीच चाललेला संघर्ष मन अस्वस्थ करून जातो. आपल्या मनाची व्यथा तो लीळाचरित्राच्या भाषेत व्यक्त करताना दिसतो. 'एक तरणु: शिकेला: उच्चविद्याविभुषीतु: परी तो बेकारू असे. तयाची भार्या अलकावती: परी तियेंला प्रवृत्ती नसे:'[३१] आपत्तीमागून आपत्ती येत असूनही मोठया उनेदीने सामाजिक कार्य करण्यासाठी उभा राहतो. एकनाथ शेतकरी संघटनेचे नेतृत्त्व करतो पण येथेही त्याच्या संघर्षाला यश येत नाही. त्याला अटक होते. शेतकऱ्यांविषयी त्याला कळवळा वाटतो म्हणून शेतकऱ्यावर होणाऱ्या अन्यायाविरूध्द संघर्ष करण्यासाठी तो उभा राहतो. त्याची ही धडपड आणि त्याचे मानसिक बळ म्हणजे शेतकऱ्यांसाठी एक उचललेले पुढचे पाऊल आहे. त्याचा हा संघर्ष अपयशी ठरला असला तरी त्याचे हे पाऊल एक प्रयत्नवादी पाऊल आहे असेच म्हणायला हवे.

आजचा ग्रामीण युवक हा कितीही अडचणी आल्या तरी त्या अडचणींवर मात करण्यासाठी सतत धडपडताना दिसून येतो. दिनकर दाभाडे सारखा युवक एम. ए. सेट पास असूनही समारंभात, लग्नप्रसंगी, बँडपार्टीसोबत बिगूल किंवा सनई वाजवताना दिसतो. त्याच्या दृष्टिकोनातून कोणतेही काम कमी दर्जाचे नसते सर्वात अगोदर पोट भरणे महत्त्वाचे असते. कौटुंबिक जबाबदारी पार पाडण्यासाठी तो हे काम करत असतो.

आजही आपल्या देशातील ग्रामीण भाग बराचसा मागासलेला आहे. खंडित वीजपुरवठा, कच्चे रस्ते, पाणी टंचाई या अपुऱ्या सुविधांनी ग्रासलेल्या अशा ग्रामीण जीवनाचे चित्रण 'बारोमास' मधून लेखकाने केलेले आहे. ग्रामीण भागात असणाऱ्या गैरसोई यांच्याशी संघर्ष करीत ग्रामीण माणूस जीवन जगत असतो. मातेच्या उदरातून जन्माला येताच त्याच्यापुढे अनंत गहन प्रश्न निर्माण झालेले असतात.

खंडित वीजपुरवठा असल्याने पीकांना पाणी देता येत नाही. पाणी टंचाई असल्यामुळे सुरक्षित शौचालय नसते. त्यामुळे अलकासारखी शहरी संस्कृतीत वाढलेली स्त्री जेव्हा ग्रामीण भागात जीवन जगू लागते तेव्हा तिला अनेक अडचणींशी संघर्ष करावा लागतो. येथे शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती या मध्येच संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. अलका ही ग्रामीण जीवनाशी कधीच समरस होऊ शकलेली नाही. अशिक्षित असणाऱ्या सासूशी तिचा सांस्कृतिक संघर्ष सुरू होतो. येथे दोन

भिन्न विचारांचा संघर्ष दिसून येतो. एक सुशिक्षित शहरी स्त्री आणि एक अशिक्षित ग्रामीण स्त्री असा संघर्ष निर्माण होतो. शेवंतामायचा जीवन संघर्ष कादंबरीच्या शेवटच्या ओळीपर्यंत चाललेला दिसून येतो. तर अलका सारखी आधुनिक स्त्री स्वत:चे अस्तित्त्व निर्माण करण्यासाठी सतत धडपडताना दिसून येते. ग्रामीण जीवन जगताना तिचे मन आणि शरीरही या परिस्थितीपुढे हतबल झालेले दिसून येते. ग्रामीण भागात जगण्यासाठीची चाललेली तिची धडपड केवळ असमर्थ ठरते. म्हणूनच ती पतीशी आणि घरातील माणसांशी संघर्ष करीत असते. शेवटी असे जीवन जगणे तिला असह्य झाल्याने ती एकनाथला एक दु:खद धक्का देऊन कायमचे सासर सोडून जाते.

ग्रामीण व्यक्तीच्या विशेषत: ग्रामीण स्त्रीच्या अंगात सोशिकता अधिक प्रमाणात दिसून येते. ती आपल्या कुटुंबासाठी जीवाचे रान करीत असते. वाटयाला येणारे दु:ख, दारिद्रय यांच्याशी संघर्ष करीत जीवन जगत असते. आपल्या कुटुंबावर आलेल्या संकटांना ती खंबीरपणे उभी राहून सामोरे जात असते. आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करते. पोटाला चिमटे काढून मुलांना शिक्षण शिकवित असते. आपल्या पतीबरोबर खांद्याला खांदा लाऊन काम करीत असते. तरीही ती कुठेही डगमगताना दिसत नाही. अशी खंबीर मनाची 'शेवंतामाय' आणि तिचा जीवनसंघर्ष लेखकाने अत्यंत ताकदीने चित्रित केला आहे. तिचा हा जीवनसंघर्ष केवळ एकटया शेवंतामायचा नसून अशा कितीतरी ग्रामीण स्त्रियांचा हा जीवनसंघर्ष आहे. हेच लेखकाने दर्शविले आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून एकनाथसारखा युवक एक नवे पाऊल उचलतो. ग्रामीण भागातील निर्माण झालेल्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे धाडस तो करू पहात आहे. सारी ग्रामीण परिस्थिती तसेच शेतकऱ्यांवर होणारे अन्याय ही परिस्थिती बदलण्याची गरज हळूहळू आजच्या युवकांना वाटू लागली आहे. असा विचार करूनच एकनाथ शेतकरी संघटनेत सामील होण्याचे धाडस करतो. शेतकऱ्यांची परिस्थिती बदलण्याची त्याची धडपड कौतुकास्पद वाटते. एकनाथ चक्काजामचे नेतृत्त्व करतो त्याने केलेले भाषण शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी उचललेले पहिले पाऊल होते. तो आपल्या भाषणात म्हणतो, "आस्मानी सुलतानी संकटाने त्रस्त झालेला आपला शेतकरीबांधव आत्महत्या करीत आहे. तरी त्याच्या मरणावर रडणारं कोणी नाही. त्याच्यावरचा अन्याय थांबलेला नाही. आणि समाज मुका - बहिरा - अंधळा झाला आहे. त्याला जागे करण्यासाठी आपला हा चक्काजाम आहे. . . ."[१२]

जुनी पिढी आणि नवी पिढी या दोन्हीमध्ये सांस्कृतिक तसेच वैचारिक

संघर्षही निर्माण होत आहे. मधु आणि शेवंतामयच्या संवादातून जुनी पिढी आणि नवी पिढी यांच्यातील संघर्ष पहावयास मिळतो.

"मायचा फोकणा त्या वावराच्या. वावरावाल्याची हमेशा तडनडच राह्यती. कधी मौज मजा करते वावरा वाला ?"

"शिव्या देऊ नाई मधु मायमावलीले."

"नाई; पूजा करावं तिची. दगडं - माती बोकणे भरून खावांव."[३३] मधुला शेतीबद्दल कधीच प्रेम वाटत नाही हे त्याच्या बोलण्यातून सूचित होते.

सुभानरावसारखे जुन्या पिढीतील शेतकरी आपल्या शेतीला 'काळी आई' मानतात. त्यांचा या काळया मातीमध्ये जीव गुंतलेला दिसून येतो. पण या विरूध्द नव्या पिढीतील मधुसारखा युवक मात्र शेतीविषयी उदासिन झालेला दिसून येतो. जुनी पिढी आपल्या पारंपरिक मूल्यांना जपणारी अशी आहे तर नवी पिढी बदलत्या काळाला सामोरे जाणारी तसेच आधुनिक मूल्यांना जोपासणारी अशी दिसून येते. परंतु दोन्ही पिढयांचा संघर्ष अयशस्वीच होतो.

आजच्या तरूणपिढीला शहरी जीवनपध्दतीचे प्रचंड प्रमाणात आकर्षण निर्माण झाले आहे. याशिवाय ग्रामीण भागात आपली काहीही प्रगती होऊ शकणार नाही याचेही आकलन त्यांना होऊ लागले आहे. म्हणूनच शहरात जाऊन काहीतरी उद्योगधंदा करून जीवन जगू शकतो. तेथे कोणीही उपाशी राहत नाही असाही विचार तो करू लागला आहे. हे खालील संदर्भावरून लक्षात येते.

"त्यांच्या पेक्षात पुण्याले जायाले पुरते. तिथी हमेशा नव्यानव्या बिल्डिगंचे कामं सुरू राह्यतात."[३४]

दु:ख आणि दारिद्रय यांच्याशी संघर्ष करीत जीवन जगणारा ग्रामीण माणूस मनात कोठेतरी एक भाग्योदयाचे स्वप्न बाळगत असतो. एक आशा उराशी बाळगलेली असते. या आशेवरच माणूस मोठया उमेदीने जीवन जगत असतो. हे खडतर आयुष्य घालवित असतो. शेतकरी अशीच आशा धरून जीवन जगत असतो. शेतकऱ्यांची संघटना तयार करून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत असाही एक विचार 'बारोमास' मधून लेखकाने मांडला आहे. या संदर्भात लेखक लिहितो, 'आपली तारणहार संघटनाच हाये. काळया आईच्या लेकायनं कधीच तिची साथ सोडू नाई. तीच आपलं भलं करणार हाये. नेत्यायचं काय नाई जुने जातील नवे येतील. पण नाव मातर तिचच पुढं चालील....'[३५]

शेतकरी आपली हिंमत हारू देत नाही. तो पुन्हा पुन्हा नव्या उमेदीने राहण्याचा

चिकाटीने प्रयत्न करीत असतो. त्याचा परिस्थितीशी चाललेला संघर्ष आणि जगण्यासाठी चाललेली त्याची धाडसी धडपड विचार करायला भाग पाडते. मन छिन्नविछिन्न होऊन जाते.

नात्यामध्ये समज - गैरसमज निर्माण होऊन संघर्ष निर्माण होत असतो. भावा - भावामधील प्रेम आटून गेलेले दिसते. पती - पत्नीमध्ये वैचारिक तेढ निर्माण होते. मुलगा आई - वडिलांना आई - वडील मानायला तयार नसतो. अशी परिस्थिती आज निर्माण झालेली दिसून येते. ही बिकट परिस्थिती निर्माण होण्याची कारणे यांचा शोध घेण्याचा प्रयत्न लेखकाने बारोमासमधून केला आहे. जीवन संघर्ष करण्यासाठी प्रत्येकाकडे एक आत्मबळ असते याची प्रचिती वाचकांना येते. 'बारोमास' ही कलाकृती एक जीवनसंघर्षाची गाथा होय. हा संघर्ष केवळ शेतकऱ्यांचा नसून तरूण पिढी, शहरी स्त्री, ग्रामीण स्त्री, नवी पिढी, जुनी पिढी यांचा विविध पातळयांवर चाललेला जीवन संघर्ष असतो. नियतीपुढे मात्र त्यांचा चाललेला संघर्ष अयशस्वीच ठरतो. तरीही त्यांचा हा संघर्ष वाखाणण्याजोगा आहे यात शंका नाही.

'बारोमास' या कलाकृतीतील ग्रामीण युवकाचा संघर्ष मन सुन्न करून जातो. कारण ग्रामीण युवक घरची आर्थिक परिस्थिती नाजुक असूनसुध्दा तो शिक्षण घेतो. पुन्हा नोकरीसाठी पन्नास ठिकाणी वणवण फिरत असतो तरीही त्याला नोकरी मिळत नाही. एवढा संघर्ष करूनही बेरोजगारीचे जीवन जगण्याची वेळ त्याच्यावर येते. अशी वेळ आज हजारो तरूणांवर आलेली आहे.

हे संघर्षमय जीवन जगताना त्याच्यापुढे हजारो प्रश्न निर्माण झालेले असतात. भविष्यकाळाची त्याला चिंता लागलेली असते. एकनाथसारखा हुशार विचारी तरूणसुध्दा अपयशी जीवन जगत असतो. संसारामध्ये अपयश आल्यामुळे त्याचे मन अधिकच ढासळून गेलेले दिसून येते. रात्रंदिवस तो वेगवेगळया विचारांमध्ये गुंतून जातो. हळूहळू त्याचे मन अस्वस्थ होत जाते. मनातील विचारांचे आंदोलन लेखक अगदी यशस्वीरीत्या चित्रित करतो. यासंदर्भात लेखक लिहितो, 'आपल्याला भूतकाळ लागला. आपल्या वर्तमानाला पाय नाहीत. भविष्याला हात नाहीत. वर्तमान आहे लंगडे.....भविष्य लुळे..... मग उगाळत बसा भूतकाळाचा कोळसा.....काळा काळा कोळ!'[३६] हे मानवी मनातील द्वंद्व विचार करायला भाग पाडते.

शेतकऱ्यांचा निसर्गाशी चाललेला संघर्ष व्यक्ती - व्यक्तीमधील संघर्ष, तरूण पिढीचा चाललेला सामाजिक संघर्ष, व्यक्तीचा मानसिक संघर्ष चित्रित करताना लेखक कमालीचा यशस्वी झालेला दिसून येतो. कादंबरीतील जीवन संघर्षाविषयी

डॉ. एस्. एम. कानडजे म्हणतात, " 'बारोमास' मधून प्रकटणारा जीवन संघर्ष बहुपेडी, अंतर्भेदी आहे. तो दोन पिढयांतील संघर्ष आहे. ग्रामीण आणि नागरी जीवन शैलीतील अंतविरोधाची त्याला छटा आहे. सुशिक्षित आणि अशिक्षित यांच्यातील दरी त्यातून जाणवते. परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील भेदाची त्याला किनार आहे. निर्मिती आणि शोषण, प्रपंच आणि व्यापार, भावना आणि स्वार्थ, चिंतन आणि बंडखोरी, जागृती आणि नफेखोरी असे अनेक पैलू या जीवनसंघर्षाला विविधांगी, पीळदार बनविण्यास कारणीभूत ठरले आहेत त्यामुळे हा शेतकऱ्यांचा जीवनसंघर्ष बहुआयामी बनून पहिल्यांदाच मराठी साहित्यात सकसतेने दमदारपणे अवतीर्ण झाला आहे."[३७] शेतकऱ्यांच्या जीवनसंघर्षाच्या चित्रणात कादंबरीचे लक्षणीय यश सामावलेले आहे.

**❖ सुशिक्षित पण बेरोजगार तरूणांच्या जीवनाची झालेली परवड: -**

देशाचे भावी नागरिक म्हणून आजच्या तरूण पिढीकडे पाहिले जाते. पण आज आपल्या देशात विशेषत: ग्रामीण भागात सुशिक्षित बेरोजगाराची संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. ग्रामीण समाजातील अनेक तरूण प्रतिकूल परिस्थितीत नोकरीच्या आशेने शिक्षण घेतात. पण एवढे शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही म्हणून सुशिक्षित बेकार म्हणून जीवन जगत असतात. समाजात सुशिक्षित बेरोजगार म्हणून अनेक तरूण फिरत आहेत. समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन झालेला असतो.

ग्रामीण भागातील युवक फक्त शिकतच राहतो कारण उच्च शिक्षण घेण्याइतकी त्याची ऐपत नसते. शिक्षण घेतले म्हणजे नोकरी मिळेल एवढी आशा मनात धरून तो शिकत असतो. अशा शिक्षणाचा त्याला काहीच उपयोग होत नाही. त्याला नोकरी मिळत नाही. शिवाय तो स्वत:च्या पायावरही उभा राहू शकत नाही. कारण आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला नोकरी मिळणे अशक्य होऊन बसलेले आहे. नोकरी मिळाली नाही म्हणून हा ग्रामीण युवक एखादा छोटा - मोठा व्यवसाय किंवा शेतीव्यवसाय करण्याकडे वळतो. पण त्यातही त्याला फारसे यश मिळत नाही.

ग्रामीण भागात हे छोटे - मोठे व्यवसाय चालत नाहीत आजचे जग हे आधुनिकिकरणाचे जग आहे. पूर्वापार चालत आलेले व्यवसाय मोडकळीस येऊन पडलेले आहेत. आधुनिक पध्दतीने व्यवसाय करण्यासाठी त्यांच्याकडे भांडवल नसते. शेतीसारखा व्यवसाय करायचा म्हटले तरी अगोदर शेतीत पदरचे भांडवल घालावे लागते. शिवाय शेती हा बिनभरवशाचा व्यवसाय आहे. निसर्गाचे लहरीपण, व्यापारीकरण, बाजारपेठा या चक्रव्यूहात सापडलेला शेतीव्यवसाय हा नफ्यापेक्षा

तोटयातच अधिक जातो. त्यामुळे शेतीविषयी अनास्था आजच्या युवापिढीच्या मनात निर्माण होते. दिवसेंदिवस शेतीचा दर्जा खालावत चाललेला आहे. शेतकऱ्यांचे जीवन म्हणजे मागासलेपणा आणि लाजीरवाणे जीवन आहे असा विचार नव्या पिढीच्या मनात निर्माण झाल्याने शेतीविषयी त्यांना तिरस्कार वाटू लागतो. सव्वीस एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाटयाला भिकाऱ्यासारखे जीवन जगण्याची वेळ येते. 'बारोमास' या कलाकृतीतील प्रत्येक तरूणाच्या मनात शेतीविषयी अनास्था निर्माण झालेली दिसून येते. ग्रामीण तरूणांसारखीच शहरातीलही तरूणही पैशासाठी गैरमार्गाकडे वळतात. लेखक येथे फक्त ग्रामीण तरूणाचाच विचार करताना दिसतो. ग्रामीण भागातील तरूण छोटी टोळी तयार करून छोटया - मोठया चोऱ्या करतात. पण शहरातील बेरोजगार तरूण मोठ - मोठया टोळीत सामील होऊन खून, डाके, दरोडे, मारामाऱ्या करतात. हेही तितकेच सत्य आहे.

औद्योगिक दळणवळणामुळे शहरी आणि ग्रामीण जीवनपध्दती जवळजवळ येत चालली आहे. आजच्या ग्रामीण पिढीला शहरी संस्कृतीचे वारे लागले आहे. शहरी वातावरणाचा चांगलाच परिणाम या पिढीवर झालेला दिसून येतो. शहरातील भौतिक सुख - सुविधांचे प्रचंड आकर्षण ग्रामीण मनाला भूल पाडते. हे आकर्षण असणे यात काही प्रमाणात तथ्यही आहे. कारण प्रत्येकालाच चांगले जीवन जगावे असे वाटत असते पण याचा दुष्परिणाम असा होतो की समाजात एक चंगळवाद निर्माण होऊन प्रत्येकाच्या भौतिक गरजा वाढत जातात. त्या गरजांची परिपूर्ती पैशाअभावी होत नाही. मग हा तरूण वैफल्यग्रस्त होतो आणि गैरमार्गाला लागतो.

आजच्या ग्रामीण जीवनात हळूहळू परिवर्तन होत चालले आहे. प्रत्येकाच्या गरजा वाढल्या आहेत. शहरी जीवनाचे वाटणारे आकर्षण दिवसेंदिवस ग्रामीण तरूणांच्या मनामध्ये वाढत चालले आहे. शहरी जीवन हे चांगले जीवन असे ग्रामीण भागातील तरूणांना वाटू लागले आहे. पण पैशाशिवाय आपण असे जीवन जगू शकत नाही कारण आजचे जग हे पैशावर चालले आहे. 'दाम करी काम' या म्हणीप्रमाणेच पैशाच्या तालावर आजची दुनिया नाचत आहे याची जाणीव आजच्या ग्रामीण युवकाला झाली आहे. पैसा मिळवण्यासाठी त्यांची कोणत्याही पातळीवर जाण्याची मानसिक तयारी झालेली दिसते. नोकरी पैशाशिवाय मिळत नाही म्हणून ग्रामीण युवक गैरमार्गाचा स्वीकार करतो. कोणत्याही मार्गाने वा गैरमार्गाने पैसा मिळवायचा हे एकच ध्येय आजच्या युवकाचे बनले आहे. गैरमार्गाने जात असतानाच बरेच तरूण व्यसनाधिनतेच्या आहारी गेलेले दिसून येतात. झटपट पैसा मिळवण्याच्या नादाने ही तरूण पिढी कौटुंबिक वा सामाजिक जबाबदारी झिडकारताना दिसून येते. 'मधु'

हा बेजबाबदार तरूणांचेच प्रतिनिधित्त्व करताना दिसून येतो. आजच्या काळात तरूणांना नोकरी नाही, म्हणून बेकार राहणे, टवाळक्या करणे व्यसनाच्या आहारी जाणे याशिवाय गुन्हेगारी क्षेत्राकडे वळणे अशी परिस्थिती तरूण पिढीवर आलेली आहे. म्हणूनच आज आपल्या देशात होणाऱ्या चोऱ्या, डाके, लुटमार, दरोडे यामध्ये तरूण पिढींच अधिक प्रमाणात दिसते. तरूणांच्या गुणवत्तेपेक्षा आर्थिक मोबदला महत्त्वाचा मानला जात असल्याने ही तरूण पिढी गरीब - दरिद्री जीवनाला कंटाळून पैसा मिळविण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब करताना दिसते. हा गैरमार्गाने मिळविलेला पैसा एखाद्या संस्थेला दलालामार्फत द्यायचा आणि नोकरी मिळवायची. नोकरी मिळाल्यावर ऐशोरामात जीवन जगायचे असा एकतर्फी विचार करून अनेक तरूण एकत्रित येऊन 'सोनेरी टोळी' सारखी टोळी निर्माण करतात.

एकीकडे शेतकऱ्यांच्या मुलांना पैशावाचून नोकरी मिळत नाही म्हणून ते बेकारीचे जीवन जगत असतात तर दुसरीकडे दूरचित्रवाहिनीवरील विविध चॅनल त्यांच्यासमोर श्रीमंत वैभवाचे चैनीतील जीवनाचे मायाजाल पसरवित आहेत. हॉटेल, बिअरबार, पाश्चात्य संस्कृती याकडे ग्रामीण तरूण खेचला जात आहे. आजच्या तरूणपिढीच्या मनात येथील समाजव्यवस्थेबद्दल असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची मुले वैफल्यग्रस्त होतात. त्यांच्या जीवनाची दिशा भरकटत जाते आणि त्यांच्या मनात गुन्हेगार बनण्याची प्रवृती हळूहळू वाढत जाते.

तरूणपिढीच्या जीवनाची झालेली परवड लेखकाने 'बारोमास' या कलाकृतीतून चित्रित केलेली आहे. सुशिक्षित बेकार तरूणांच्या मनाची झालेली घुसमट, त्यांचे उद्ध्वस्त झालेले जीवन, त्यांच्या व्यथा - वेदना 'बारोमास' मधून मांडल्या आहेत. सुशिक्षित पण बेरोजगार जीवन जगणाऱ्या तरूणांची झालेली परवड याचा शोध आपण व्यक्तिरेखांच्या अनुषंगाने घ्यावयाचा आहे.

**एकनाथ: -**

कादंबरीचा प्रमुख नायक 'एकनाथ' हा ग्रामीण सुशिक्षित बेरोजगार तरूण पिढीचे प्रतिनिधित्व करताना दिसून येतो. एकनाथ हा एम. ए. बी. एड. पर्यंत शिक्षण घेतलेला एक सुशिक्षित तरूण आहे. सात - आठ वर्षे नोकरीसाठी अनेक मुलाखती देतो पण प्रत्येक ठिकाणी एकच अनुभव वाटयाला येत असतो. एक लाख रूपये डोनेशन भरल्याशिवाय नोकरी मिळत नाही. डोनेशनसाठी त्यांच्याकडे पैसेच नसतात. शेती विकण्यास वडिलांचा नकार असतो. शेवटी नाईलाजास्तव तो शेती करू लागतो. नोकरी न लागल्याने त्याला 'सांजोळ' या भकास गावातच जीवन घालवावे लागते. नोकरी आज ना उद्या मिळेल या आशेवर त्याने शहरातील

वातावरणात वाढलेल्या अलकाशी लग्न केलेले असते. पण भविष्यात त्याला नोकरी लागतच नाही. शेतीव्यवसायातही तो अयशस्वीच ठरतो. कारण शेतीव्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असतो. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ पडतो. त्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान होते. शेतीत काहीच उत्पन्न निघत नसते. याउलट शेती दिवसेंदिवस तोटयातच जाते. ग्रामीण जीवनाला कंटाळून 'अलका' कायमची माहेरी निघून जाते. त्याच्या संसाराची पूर्णपणे वाताहत होते. कौटुंबिक जीवन पूर्णपणे विस्कळीत होते. सारी नाती - गोती असूनही एकनाथ एकटाच पडतो. एकनाथच्या मनातील भावनांविषयी लेखक लिहितो, '....आपण एकाकी निराधार बायको असून नवरा नाही. भाऊ असून भाऊ नाही. मायबाप असून लेक नाही. आपण कोणाचेच कोणी नाही. कोणालाच काही देऊ शकत नाही. म्हणून आपण उपरे! आपल्याला जर नोकरी असती, आपण जर चार पैसे कमावले असते, तर आपलं नातं सर्वांनी मानलं असतं. खरं म्हणजे माणूस कोणीच कोणाचा नसतो. माणसाला किंमत असते माणसाला नाते असते तेव्हा. तेव्हा, की जेव्हा त्याच्याजवळ पैसा आहे.... पैशान सगळं विकत घेता येतं. नाते - गोते, बहीण - भाऊ, माय - बाप, बायको. हा पैसा आपल्यापासून दूर जात राहिला तसे नातेगोतेही दूर - दूर गेले'[३८]

एकनाथच्या जीवनाची झालेली परवड मनाला अस्वस्थ करून जाते. ही कुणा एका एकनाथची व्यथा नसून समाजात असे कितीतरी सुशिक्षित बेरोजगारीचे अयशस्वी जीवन जगणारे एकनाथ भेटताना दिसतील. गुणवत्ता, बुध्दिमत्ता असून केवळ पैशाअभावी एकनाथच्या जीवनाची होरपळ होताना दिसून येते. सुशिक्षित असूनसुध्दा अशिक्षितासारखे जीवन जगतो, रात्रंदिवस शेतात राबतो तरीही तो सुखी होत नाही. एकनाथच्या मनात शिक्षणाविषयी उदासिनता निर्माण झालेली असते. याविषयी तो म्हणतो, 'आपल्या शिक्षण घेण्याच्या उर्मीत आपण तरी टवटवीत होतोच ना मग एवढं शिक्षण घेऊन आपल्यात आणि काहीच शिक्षण न घेतलेल्या खंडयात काहीच फरक उरला नाही. त्यामुळे वैफल्याचं झाड वाढीला लागलं'[३९] आजच्या काळात गुणवत्तेपेक्षा पैशाला जास्त किंमत आहे. म्हणून एकनाथसारख्या हुशार तरूणाला बेकारीची जीवन जगावे लागते.

**मधु :-**

एकनाथचा धाकटा भाऊ 'मधु' हा सुशिक्षित तरूण बेकार म्हणून जीवन जगत असतो. बारावी सायन्स फर्स्ट क्लास मिळविलेला मधु कृषिपदविकेपर्यंत शिक्षण घेतो. स्पर्धापरीक्षेमध्ये पास झालेला असतो. पण पैशाअभावी त्याला नोकरी मिळत

नाही. तो बेकारीत जीवन जगत असतो. हळूहळू त्याची मानसिकता बदलून जाते. तो सुशिक्षित असून गैरमार्गाला लागतो. आपल्या देशातील समाज व्यवस्थेला दोष देतो. त्याच्यासारखेच गावात सुशिक्षित बेकार म्हणून फिरणाऱ्या तरूणांना एकत्रित करून एक सोनेरी टोळी निर्माण करतो. या टोळीचा तो मुख्य नायक होतो. त्याचे वर्तनही एखाद्या गुंडासारखेच असते. तो दिसतोही गुंडासारखाच. या विषयी लेखक लिहितो, 'डोळे लाल जर्द. केस भुरके टुरूक. हातात काहीतरी कुऱ्हाडीसारखं गंजलेलं जुनाट हत्यार. कपडे चुरगाळलेले'[४०]

मधु संपूर्ण कादंबरीभर एक बेपर्वाही बेजबाबदार तरूण म्हणून वावरताना दिसतो. त्याने कौटुंबिक जबाबदारी पूर्णपणे झिडकारलेली दिसून येते. आई - वडील, भाऊ - बहीण, भावजय, मेहूणा यांचीही तो कसलीच कदर करीत नसतो. त्याने सर्व मानमर्यादा ओलांडलेल्या असतात. तो घरात पैशासाठी चोऱ्या करतो, वस्तू विकतो, शेतातील झाडे तोडून विकतो. रात्री बेरात्री बाहेर राहतो. गुप्तधन शोधण्यासाठी टोळीतील तरूणांना घेऊन रात्र - रात्र माती उकरत असतो. गुप्तधन शोधण्यासाठी तो बनुबासारख्या भोंदूला एका रात्रीसाठी पाचशे रूपये देतो. मधुला बनुबाचा भोंदूपणा कळत असूनसुध्दा एक टोळीचा आधार म्हणून त्याला बोलावत असतो.

रात्री - बेरात्री टोळीला घेऊन गढया, उकिरडे उकरित फिरत असतो. हा एकच उद्योग त्याला लागलेला असतो. कधीतरी एखादा धनाचा हंडा सापडेल मग चैनीत जीवन जगता येईल असा एक विचार त्याच्या मनात सतत घुमत असतो. मधुच्या मनात शेतीविषयीची उदासिनता ठासून भरलेली दिसून येते. हे त्याच्या बोलण्यातून सहजपणे स्पष्ट होते. तो म्हणतो, 'मायचा फोकणा त्या वावराच्या. वावरावाल्याची हमेशा तडनडच राह्यती. कधी मौजमजा करते वावरवाला ?'[४१] मधुच्या मनात शेतीविषयी घृणा अधिक जाणवते. त्याच्या दृष्टिकोनातून शेतीव्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला भिकाऱ्यासारखे जीवन जगावे लागते. सदान्‌कदा शेतकरी कंगाल असतो. कोणतीच हौसमौज करता येत नाही त्यापेक्षा शेती विकणे त्याला योग्य वाटते. ग्रामसेवकाची नोकरी मिळविण्याच्या हट्टापायी शेती सावकाराकडे गहाण टाकायला आई - वडिलांना भाग पाडतो आणि सावकाराकडे करारनामा करून दोन लाख रूपये कर्ज काढतो. एक लाख रूपये दलालाला देतो. एक लाख रूपये घरात आईकडे ठेवतो. पण मधु हा पूर्णपणे फसविला जातो. नोकरी तर मिळतच नाही पण एक लाख रूपयेही पाण्यात जातात. पुन्हा मधु गुप्त धनाचा शोध घेण्याच्या मागे लागतो. शेवटी हाती काहीच लागत नाही म्हणून रात्री हायवे

रस्त्यावरून येणाऱ्या - जाणाऱ्या गाडया लुटून पैसा कमवायचा असा विचार मधु आणि त्याच्या सोनेरी टोळीतील मित्र करतात. येथे गुन्हेगारीला जवळ करू पाहणारे तरूण पहावयास मिळतात.

एकीकडे सुशिक्षित लाचार झालेले ग्रामीण तरूण नोकरीसाठी अधिकाऱ्याच्या दारोदार भटकतात तरी नोकरी मिळत नाही तर दुसरीकडे श्रीमंत भरमसाठ डोनेशन भरून आधीच जागा कायम करून घेतात. नोकरी देणारे हे शासकीय अधिकारी भ्रष्टाचार करताना दिसून येतात. शासकीय अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार नोकऱ्यांचे झालेले बाजारीकरण या साऱ्या गोष्टीना बळी पडलेले हे सुशिक्षित तरूण शेवटी गैर मार्गाचा अवलंब करताना दिसून येतात. हे वास्तव आहे.

**दिनकर: -**

आजच्या ग्रामीण युवकांना सुशिक्षित असूनही पैशाअभावी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असते. एखाद्या तरूणाला त्याच्या घरची सारी जबाबदारी एकटयाला सांभाळावी लागते तेव्हा तर त्याची परिस्थिती आणखी वाईटच असते.

'दिनकर दाभोडे'सारखा 'राज्यशास्त्र' या विषयात 'एम. ए.' फर्स्ट आणि 'सेट' पास असूनही समारंभात किंवा लग्नात बँडपार्टीमध्ये सामील होऊन बिगूल किंवा सनई वाजवित असतो. कारण त्याच्यावर त्याच्या धाकटया बहिणीच्या लग्नाची जबाबदारी असते. नोकरीसाठी तोही वणवण फिरतो पण पैशाअभावी त्यालाही नोकरी मिळत नाही. आज गुणवत्तेपेक्षा आर्थिक, मोबदल्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षण असून नोकरीसाठी पैसा असणे गरजेचे बनले आहे. अन्यथा सुशिक्षित बेरोजगार म्हणून जीवन जगावे लागते ही आजच्या तरूण मनाची शोकांतिका आहे. दिनकर हा पैशाच्या आशेने सोनेरी टोळीत सामील होताना दिसतो. आपण काही शिकलोच नाही असा विचार करूनच रात्री - बेरात्री गढया उकरण्यास जात असतो.

**दिलीप पवार: -**

'बारोमास' या कलाकृतीतून लेखकाने कितीतरी तरूणांच्या जीवनाची झालेली परवड शब्दरूपाने मांडली आहे. 'दिलीप पवार' सारखा एखादा तरूण केवळ पैशाअभावी आयुष्यातूनच उठतो. उद्‌ध्वस्त झालेल्या त्याच्या जीवनाची शोकांतिका हृदयात घर करून राहते. दिलीप पवार याला त्याच्या आईने मोलमजुरी करून बी. एड. पर्यंत शिकविलेले असते. तो विनाअनुदानित शाळेवर तीन वर्षे बिनपगारी नोकरी करतो. नंतर त्या शाळेला शासकीय मान्यता येते पण कायम करून घेण्यासाठी संस्थाचालक एक लाख रूपये डोनेशन मागतात. डोनेशन भरण्यासाठी त्याच्याकडे पैसे

नसतात. शिवाय विकण्यासाठी शेतही नसते. आठ पत्रे असणारे घर ही तेवढी त्याची इस्टेट असते. पैशाअभावी नोकरी जाईल म्हणून तो पैशाच्या आशेने सोनेरी टोळीत सामील होतो. या संदर्भात लेखक लिहितो, 'देवा हनुमंता, चांगला मोठा हंडा सापडू दे रे बाबा माझ्या वाटयावर निदान दोन लाख आले पाहिजे. ही सुटी संपायच्या आत, एक जुलैच्या आत बंदोबस्त झाला तर बरं नाहीतर संस्थेवाले घेतात दुसरा. मग काही आपलं खरं नाही'[४२] त्याची नोकरी म्हणजे टांगती तलवार असते. पैसे भरले तरच नोकरी राहणार असते अन्यथा तेथे दुसरा घेतला जाणार असतो अशी भीती ही त्याच्या मनात निर्माण झालेली असते. सोनेरी टोळीतील सर्वजण रात्रीची गढी खोदत असतात आणि अचानकपणे खोदताना एक मानवी प्रेताचा सापळा दिलीप पवारच्या अंगावर पडतो आणि त्याचे मानसिक संतुलन बिघडते. तो वेडा होतो. वेडयाच्या भरात तो सतत बडबडत असतो. दिलीप आयुष्यातून पूर्णपणे उठतो. सुशिक्षित असूनही अशिक्षितासारखा वागतो. रस्त्यावरून येणाऱ्या - जाणाऱ्या गाडयांना हात करतो. विचित्रपणे वागतो. त्याचे सारे भान हरवून गेलेले असते. वेडेपणामुळे दिलीपचा सारा चेहरा मोहराच बदलून गेलेला असतो. त्याच्या या भयानक रूपाविषयी लेखक लिहितो, 'दाढीचे केस वाढलेले. डोईचे केस विस्कटलेले. धूळ भरलेले. अंगावरचे कपडे घामाचे थर साचून मळलेले. तरी त्याने अंगातला शर्ट पॅन्ट मध्ये टाकला होता. वर पट्टाही लावलेला. पण पायात काहीच नाही'[४३] एखादा मानसिक धक्काही मनावर जबरदस्त आघात करून जातो याचा प्रत्यय दिलीप पवारच्या व्यक्तिरेखेतून येतो.

सोनेरी टोळीत सामील झालेले इतर तरूणही सुशिक्षित असतात. पण ते सुध्दा बेरोजगारीचे जीवन जगत असतात. 'गज्या' आय. टी. आयपर्यंत शिकलेला असतो. 'दाम्या' हा सुध्दा आय. टी आय. झालेला असतो. 'तेजस गवई' हा डी. एड. होऊन पाच वर्षे झालेली असतात. पण तोही बेकार म्हणून फिरत असतो. 'नरेश चांदणे' डी. एड. झालेला असतो. पण सहा वर्षे झाले तो बेकार म्हणून गावात फिरत असतो. तर 'प्रवीण तनपुरे' बी. एड. झालेला सुशिक्षित तरूणही गावात भटकत फिरत असतो. या तरूण पिढीच्या मनातील व्यथेविषयी लेखक लिहितो, 'मायबाप खाल्ला तुकडा अंगी लागू देत नाई. वावरात काम आता आमाला करा वाटत नाई.'[४४]

आपण एवढं पदवीपर्यंत शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही. शेवटी मातीतच आपले सारे आयुष्य जाणार असा न्यूनगंडही या तरूण पिढीच्या मनात निर्माण होतो. गरीब शेतकऱ्यांच्या मुलाने शिक्षण घेऊच नये का ? असाही एक प्रश्न निर्माण झाला आहे. श्रीमंत आपल्या मुलांना भरमसाठ डोनेशन भरून नोकरीला

लावतात. पण शेतकऱ्यांची मुले रात्री बेरात्री उकिरडे गढया उकरताना दिसतात. शेतीव्यवसाय करायचा म्हटले तरी शेतात उत्पन्नापेक्षा खर्चच अधिक होत असतो. खर्च वजा जाता हातात हजार रूपयेसुध्दा शिल्लक राहत नाहीत. म्हणजे शेतीव्यवसायही या तरूणांना नवे जीवन देऊ शकत नाही हे कटू सत्य 'बारोमास' मधून सांगण्याचा प्रयत्न देशमुखांनी केलेला आहे.

गरीब शेतकरी पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलांना शिकवितात. मुलगा शिकला की नोकरी मिळेल. मग आपण आपण सुखाचे घास खाऊ असे प्रत्येक आई - वडिलांचे स्वप्न असते. पण आजच्या काळात नोकरीचे झालेले बाजारीकरण, समाजव्यवस्थेला लागलेली भ्रष्टाचाराची किड हे स्वप्न कधीच सत्यात उतरू देत नाहीत. सुशिक्षित तरूण हा वाममार्गाकडे झुकत चालला आहे. झटपट पैसा मिळवण्यासाठी सर्व नीतीमूल्ये पायदळी तुडवित असतो. कौटुंबिक नातेसंबंधामध्ये समज - गैरसमज होऊन दुरावा निर्माण होतो. मधुसारख्या हुशार तरूणाचे जीवन भयाण होऊन जाते. त्याची वैचारिकता पूर्णपणे बदलून गेलेली असते. आपल्या आई - वडिलांचाही तो आदर ठेवत नाही. केवळ 'पैसा' हेच सर्वस्व मानतो.

शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण अधिक दिसून येते. कारण शहरात छोटे - मोठे व्यवसाय करून तरूण आपली प्रगती करू शकतो पण ग्रामीण तरूण मात्र आहे त्याच ठिकाणी जीवन जगत असतो. हातात केवळ कागदोपत्री पदवी घेऊन उपयोग नसतो तर नोकरीसाठी पैसा हेच आजच्या काळातील औषध आहे. पैसा नसेल तर त्याचे आयुष्य उजाड बनते. याचेच चित्र 'बारोमास'मधून चित्रित केले आहे. प्रत्येक खेडेगावात डी. एड., बी. एड., आय. टी. आय., कृषिपद्वीकेपर्यंत शिक्षण घेतलेले तरूण पैशाअभावी अयशस्वी जीवन जगताना दिसतात. ही खरी शोकांतिका तरूणपिढीची आहे असे म्हणणे युक्त ठरेल.

**समारोप**

उपरोक्त प्रकरणात आपण नायक 'एकनाथ' याची तत्त्वनिष्ठा आणि जीवनमूल्ये, हृदयस्पर्शी स्त्रीव्यक्तिरेखा, सुशिक्षित तरूणाच्या जीवनाची झालेली परवड, त्यांचा जीवन संघर्ष आणि धडपड यांचा अभ्यास केला. 'बारोमास' मधील प्रत्येक व्यक्तिरेखा ती स्त्रीव्यक्तिरेखा असो की पुरूष व्यक्तिरेखा असो प्रत्येकाचा जीवनसंघर्ष कौतुकास्पद आहे. जीवनात कितीही अडचणी आल्या तरी त्यांना जगण्याची आशा कोठेतरी वाटत असते. जीवन म्हणजे एक संघर्ष आहे याची जाणीव प्रत्येकाला झाली आहे. म्हणूनच एकनाथसारखा सुशिक्षित तरूण नवी वाट चोखाळण्याचा प्रयत्न

करताना दिसतो. एखादी व्यक्ती जीवनामध्ये आलेल्या संकटामुळे पूर्णपणे खचून जाते. त्यांची जगण्याची उर्मी जेव्हा संपते तेव्हा आपले जीवन संपवून मुक्त होताना दिसते. तणावग्रस्त जीवन जगताना त्यांच्या मनाची घुसमट होते. जीव गुदमरल्यासारखा होतो. म्हणून तणावग्रस्त जीवन जगण्यापेक्षा जीवण संपवणे हा मार्ग त्याच्या दृष्टीने योग्य वाटतो. कादंबरीतील प्रत्येक स्त्रीव्यक्तिरेखा हृदयाला स्पर्श करून जाते. ही प्रत्येक व्यक्तिरेखा एक वेगळा विचार देऊन जाते. पारंपरिक विचारांबरोबर आधुनिक विचारांची स्त्रीव्यक्तिरेखा मनाला स्पर्शून जातात.

तरूण पिढीच्या मनातील धगधगता, आक्रोश शिक्षणसंस्थाचालकाच्या कानावर किंवा शासकीय अधिकाऱ्यांच्या मेंदूपर्यंत जाईल का ? दिवसेंदिवस बेरोजगरी वाढत चालली आहे. दिशाहीन झालेल्या तरूणांना योग्य दिशा कोण देणार ? असे अनंत ज्वलंत प्रश्न 'बारोमास' या कादंबरीने समाजासमोर मांडले आहेत. सामाजिक जीवनाचे वास्तव भान आणून देणारी ही कादंबरी लेखकाने सक्षमरीत्या साकार केली आहे.

प्रत्येक सुशिक्षित असलेल्या तरूणाची ही करूणकहाणी आहे. 'बारोमास' या कादंबरीला पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील पुरस्कार प्रदान करताना डॉ. रावसाहेब कसबे यांनी ' 'बारोमास' ही कादंबरी म्हणजे आजच्या तरूण पिढीचं प्रातिनिधिक आत्मकथन आहे' असे म्हटले आहे. ते अगदी समर्पक आहे.

## संदर्भ

१. देशमुख सदानंद, बारोमास, प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे, द्वितीयावृत्ती २००५, पृ. १.

२. तत्रैव, पृ. १३६.

३. डॉ. नेमाडे भालचंद्र, ३ जून २००३, मुंबई ६८.

४. देशमुख सदानंद, उनि. पृ. ३४१.

५. तत्रैव, पृ. २४९.

६. तत्रैव, पृ. ८.

७. तत्रैव, पृ. ५.

८. तत्रैव, पृ. ९६.

९. तत्रैव, पृ. १५५.

१०. तत्रैव, पृ. १६१.

११. तत्रैव, पृ. १८२.

१२. तत्रैव, पृ. २०७.

१३. तत्रैव, पृ. २४७.

१४. तत्रैव, पृ. ३४६.

१५. तत्रैव.

१६. तत्रैव, पृ. ३४९.

१७. तत्रैव, पृ. २०.

१८. तत्रैव, पृ. १४२.

१९. तत्रैव, पृ. १४२.

२०. तत्रैव, पृ. १६१.

२१. तत्रैव.

२२. तत्रैव, पृ. २०.

२३. तत्रैव, पृ. १२६.

२४ . तत्रैव, पृ . ५६ .

२५ . तत्रैव, पृ . ६८ .

२६ . तत्रैव, पृ . ८० .

२७ . तत्रैव, पृ . २१ .

२८ . तत्रैव, पृ . १६ .

२९ . देशपांडे बालशंकर, कादंबरी विवेचन आणि विश्लेषण, पुणे, प्रथमावृत्ती १९९८, पृ . २७ .

३० . देशमुख सदानंद, उनि . पृ . १७२ .

३१ . तत्रैव, पृ . २२७ .

३२ . तत्रैव, पृ . ३४२ .

३३ . तत्रैव, पृ . १५१ - १५२ .

३४ . तत्रैव, पृ . ३४३ .

३५ . तत्रैव, पृ . ३२६ .

३६ . तत्रैव, पृ . २५६ .

३७ . डॉ . कानडजे एस् . एम् ., बारोमास, तृतीयावृत्ती २००७, पृ . ३५९ वरून उध्दृत .

३८ . देशमुख सदानंद, उनि . पृ . ३७ .

३९ . तत्रैव, पृ . २५७ .

४० . तत्रैव, पृ . १५१ .

४१ . तत्रैव .

४२ . तत्रैव, पृ . ३४ .

४३ . तत्रैव, पृ . ७७ .

४४ . तत्रैव, पृ . ४८ .

***********